श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ३९

**प.पू. सद्‌गुरु श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर**

**यांचे चरित्र**

**प्रकाशिका** : **सौ.अनुराधा दीपक केळकर**
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन,
गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३
भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

**प्रथम आवृत्ति** : इ.स. २०११

**प्रकाशन दिन** : सोमवार दि. ५-१२-२०११
मार्गशीर्ष शुद्ध एकादशी, शके १९३३
(प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथि)

**सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन**

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**प्रसाद मूल्य** : रु. २०/-

---

**प्रत मिळणेचे ठिकाण :** श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ३९

# प.पू. सद्‌गुरु
# श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर
# यांचे चरित्र

ॐ

◆ **लेखक** ◆

**प्रा.डॉ.के.वा.आपटे**

◆ **प्रकाशिका** ◆

**सौ. अनुराधा दीपक केळकर**

**प्रथम आवृत्ति** **सांगली** **इ.स. २०११**

## प्रास्ताविक

महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यात चिमड संप्रदायाचे अनुयायी पसरलेले आहेत. निंबरगीकरमहाराजांच्या अनुज्ञेने रामभाऊ यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज यांनी चिमड संप्रदायाचे प्रवर्तन केले आणि चिमड संप्रदाय वाढत गेला.

चिमडमहाराज व त्यांच्या पत्नी माईसाहेब यरगट्टीकर यांची चरित्रे प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी लिहिलेली आहेत. या दांपत्याला दाजीसाहेब, नारायणराव आणि उद्धवरावजी असे तीन अधिकारी पुत्र होते. त्यापैकी नारायणराव व उद्धवराव यांची चरित्रे श्रीदासराममहाराजांनी लिहिलेली होती.पण दाजीसाहेबांचे चरित्र मात्र कुणी लिहिले नव्हते.

दाजीसाहेब हे पूर्वजन्मीचे योगी व परमार्थातील अधिकारसंपन्न पुरुष होते. चिमडमहाराजांचे नंतर त्यांनी काही काळ चिमडमठाधिपति म्हणून चिमड संप्रदायाचे नेतृत्त्व केले होते. त्यांचे विषयी थोडी माहिती उपलब्ध आहे. ती सुसंगत पद्धतीने एकत्र करून दाजीसाहेबांचे चरित्र लिहावे असे मला वाटले आणि त्याचे दृश्य फळ म्हणजे प्रस्तुतचे दाजीसाहेबांचे संक्षिप्त चरित्र होय. ते वाचकांनी गोड करून घ्यावे अशी विनंती आहे.

**- के.वा.आपटे**

## प्रकाशिकेचे मनोगत

चिमड संप्रदाय हा स्वरूप संप्रदाय आहे. या संप्रदायाची स्थापना भगवान सद्गुरु श्रीनारायणराव भाऊसाहेब ऊर्फ श्रीगुरुलिंगजंगममहाराज निंबरगीकर यांनी केली. श्रीनिंबरगीकरमहाराजांचे श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज हे पट्टशिष्य होते. श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराजांचे दोन प्रमुख शिष्य झाले. एक म्हणजे प.पू.सद्गुरु श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर व दुसरे म्हणजे प.पू.श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर. यापैकी श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर यांनी निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेनुसार चिमड येथे वास्तव्य केले व तेथेच परमार्थाची ध्वजा रोवली. व येथूनच आपला चिमड संप्रदाय सुरू झाला. यामुळे खऱ्या अर्थाने प.पू.सद्गुरु श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर हेच चिमड संप्रदायाचे मूळ प्रर्वतक ठरले. श्रीरामभाऊमहाराजांनी इ.स.१८९१ साली देह ठेवला. त्यानंतर चिमड मठाधिपती म्हणून प.पू.मातोश्री श्रीलक्ष्मीबाई अक्का ह्या मठ सांभाळित होत्या. त्यांनी आपले निर्याण निश्चित केले होते. श्रीरामभाऊमहाराजांना श्रीदाजीसाहेब नावाचे ज्येष्ठ चिरंजीव होते. त्यांचा जन्म इ.स. १८८० साली झाला होता. प.पू.मातोश्री लक्ष्मीबाई अक्कांनी जेव्हा देह ठेवणेचे निश्चित केले त्यावेळी श्रीदाजीसाहेबमहाराजांचे वय १७ वर्षे होते. लक्ष्मीबाई अक्कांनी आपले पश्चात् श्रीदाजीसाहेबमहाराजांना चिमडमठाचे गादीवर बसविणेचे निश्चित केले व त्याप्रमाणे त्यांनी श्रीदाजीसाहेबमहाराजांना गादीवर बसविले. यावेळी श्रीदाजीसाहेबमहाराजांचे वय १७ वर्षे होते. लहान वयातच त्यांनी साधन करून साधनसिद्धता प्राप्त करून घेतली होती. चिमड गावातील लोकांना तसेच येणाऱ्या भक्तांचे मनात विचार आला की, 'हे लहान पोर काय मठ सांभाळणार.' परंतु जेव्हा श्रीदाजीसाहेबमहाराजांनी ज्ञानेश्वरीवर अस्खलीत दोन तास प्रवचन केले तेव्हा या सर्व लोकांनी तोंडात बोटे घातली व त्यांचे

पाय धरले. अशा महान अधिकाराचे श्रीदाजीसाहेबमहाराज होते.

प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी खऱ्या अर्थाने चिमड संप्रदायाची वाङ्मयीन सेवा केली आहे. निंबरगीकरमहाराज,चिमडमहाराज, लक्ष्मीबाई अक्का, नारायणमहाराज यरगट्टीकर, माईसाहेबमहाराज यरगट्टीकर व श्रीदासराममहाराज केळकर यांची अत्यंत रसाळ अशी चरित्रे लिहिली आहेत. या गुरुपरंपरेपैकी श्रीदाजीसाहेबमहाराजांचेच चरित्र लिहिणे बाकी होते. मी प्रा.डॉ.के.वा.आपटे तथा श्रीकेशवकाका यांना विनंती केली की प.पू.श्रीदाजीसाहेबमहाराजांचे चरित्र आपण लिहावे. या विनंतीला मान देऊन त्यांनी हे चरित्र लिहिले व हे चरित्र प्रकाशित करण्याचा मान मला मिळाला हे माझे भाग्य आहे.

अशीच सेवा माझे हातून घडावी अशी प्रार्थना माझे सद्‌गुरु श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी करते व येथेच थांबते.

**सद्‌गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।।**

सांगली,
श्रीज्ञानेश्वरमहाराज
संजीवन समाधी दिन
दि.२३:११:२०११

**अनुराधा दीपक केळकर**

## अनुक्रमणिका


**प्रास्ताविक**

**प्रकाशिकेचे मनोगत**

| | |
|---|---|
| **प्रकरण १** | **१** |
| **प्रकरण २** | **१२** |
| **प्रकरण ३** | **२४** |
| **प्रकरण ४** | **३१** |
| **संदर्भ ग्रंथ सूची** | **४२** |
| **प.पू.श्रीदाजीसाहेबमहाराज यांचे हस्ताक्षर** | **४३** |
| **श्लोक** | **४४** |
| **श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची** | **४५** |

# प्रकरण १

परमपूज्य श्रीमत् सद्गुरु श्रीदाजीसाहेब यरगट्टीकर हे ज्या कुळात जन्मास आले त्या कुळाचे मूळ नाव यरगट्टीकर असे नव्हते, तर ते हुद्दार असे होते. या हुद्दार घराण्यातील दोन पुरुष यरगट्टी या गावी वसती करण्यास गेले आणि मग त्यांनी यरगट्टी या गावाच्या नावावरून तयार होणारे यरगट्टीकर हे नाव आपणासाठी स्वीकारले आणि मूळचे हुद्दार हे नाव वापरणे बंद केले. मग त्यांचे वंशजही यरगट्टीकर हेच नाव उपयोजू लागले.

यरगट्टीकर / हुद्दार घराण्याची फार प्राचीन पूर्वजांची माहिती मिळत नाही. आणि आत्तासुद्धा जी थोडीफार माहिती मिळते तीसुद्धा अगदी तुटपुंजी आहे. त्यांच्या नावापलीकडे फारशी माहिती उपलब्ध होत नाही. उपलब्ध माहितीनुसार, हुद्दार हे घराणे प्रारंभी मिरज या इतिहासप्रसिद्ध गावात रहात होते. आणि तेथे या घराण्याचे पूर्वज महादेवराव हे रहात होते. यांचा व्यवसाय काय होता हे ज्ञात नाही. या महादेवरावांना सखारामपंत हा एकुलता एक मुलगा होता. या सखारामपंतांना त्रिंबकराव आणि अप्पाजीपंत असे दोन पुत्र होते. या दोघा भावांकडील अप्पाजीपंतांचा वंश पुढे चालू राहिला नाही.

त्रिंबकरावांना आबाजीपंत, अंताजीपंत, बाळकृष्णपंत आणि लक्ष्मणराव असे चार चिरंजीव होते. या चौघांतील पहिले दोन म्हणजे

आबाजीपंत आणि अंताजीपंत हे आपले मिरज हे गाव सोडून, कर्नाटकातील यरगट्टी या गावी स्थलांतरित झाले. मिरजेसारखे प्रसिद्ध गाव सोडून कर्नाटकातील यरगट्टी या तादृश अप्रसिद्ध खेडेगावी रहाण्यास ते दोघे का गेले याची कारणपरंपरा ज्ञात नाही. एक अगदी उघड दिसते की मिरज गाव सोडून जाण्यास त्यांना काहीतरी अत्यंत गंभीर कारण घडले असावे. असे म्हणण्याचे कारण असे की त्यांनी केवळ मिरज हे गाव सोडले इतकेच नव्हे तर आपले मूळचे हुद्दार हे आडनावही त्यांनी सोडून दिले, आणि ज्या यरगट्टी गावी ते रहाण्यास गेले होते, त्या यरगट्टी या ग्रामनामावरून सिद्ध झालेले यरगट्टीकर हे नवीन नाव त्यांनी धारण केले आणि तेच नाव वापरण्यास प्रारंभ केला. या दोघा बंधूंनी मिरज गाव का सोडले हे ज्याप्रमाणे माहीत नाही, त्याप्रमाणे त्यांनी महाराष्ट्रातील एकादे गाव न निवडता कर्नाटकातील यरगट्टीसारखे खेडेगाव का निवडले हेही ज्ञात नाही. यरगट्टी हे गाव कर्नाटक राज्यात बेळगाव जिल्ह्यातील परसगड नावाच्या तालुक्यापैकी मुरगोड नावाच्या महालात होते.

यरगट्टीकर (हुद्दार) कुटुंब ब्राह्मण होते. या घराण्याचे गोत्र भारद्वाज असून, सूत्र आश्वलायन आहे. या कुटुंबाची कुलदेवता 'बनशंकरी' आहे. भगवान् शंकराची उपासना या कुळात प्रथमपासून प्रचलित होती. तसेच हे यरगट्टीकर घराणे हे रामदासी संप्रदायाचे होते. साहजिकच प्रतिवर्षी समर्थ रामदास स्वामींच्या सज्जनगडची यात्रा करून, समर्थ रामदासस्वामींच्या समाधीचे दर्शन घेण्याची परंपरा या कुळात चालू होती. खेरीज समर्थ रामदासस्वामींच्या दासबोध या ग्रंथराजाचे पठण करण्याची प्रथाही या कुळात चालू होती. म्हणूनच कदाचित् या घराण्यातील एका पवित्र पुरुषाला समर्थ रामदासस्वामींनी प्रत्यक्ष प्रगट होऊन दासबोध हा ग्रंथ दिला होता.



हुद्दार घराण्यातील आबाजीपंत आणि अंताजीपंत हे यरगट्टी या गावी जरी नवीनच होते, तरी लौकरच तेथे त्यांचे व्यवस्थित बस्तान बसले. आबाजीपंत हे कोणता व्यवसाय करीत हे ज्ञात नाही. त्यांचे बंधु अंताजीपंत हे वकिलीचा व्यवसाय करीत. त्यांच्या पत्नीचे नाव कृष्णा असे होते. या सौ. कृष्णाबाईपासून अंताजीपंतांना दोन पुत्र झाले. त्यांतला थोरला त्रिंबकराव नावाचा होता, तर धाकटा मुलगा रामचंद्र या नावाचा होता. आबाजीपंत हे निपुत्रिक होते. म्हणून त्यांनी आपल्या धाकट्या भावाच्या त्रिंबकराव या ज्येष्ठ पुत्रास दत्तक घेतले. या दत्तक गेलेल्या त्रिंबकरावांना बळवंतराव आणि सखारामपंत असे दोन पुत्र झाले. अंताजीपंतांचे धाकटे चिरंजीव रामंचद्रराव हे होत. त्यांच्या पत्नीचे नाव सौ. सीता ऊर्फ माई असे होते. हे रामचंद्रराव आणि सौ. सीताबाई हे दाजीसाहेबांचे मातापिता होते. हे रामचंद्रराव पुढे रामभाऊमहाराज यरगट्टीकर अथवा चिमडमहाराज या नावाने प्रसिद्ध झाले.

अंताजीपंत आणि सौ. कृष्णाबाई या दांपत्याला ज्येष्ठ शुद्ध १०, शके १७७५ (इ. स. १८३३) जो पुत्र झाला होता त्याचेच नाव रामचंद्र असे ठेवण्यात आले होते. त्याचा जन्म यरगट्टी गावातच झाला होता. रामचंद्राचे जन्मनाव योगेश्वर असे होते. पुढे बारश्याच्या वेळी त्याचे नाव रामचंद्र असे ठेवण्यात आले. मोठे झाल्यावर त्या रामचंद्रला लोक रामभाऊ म्हणू लागले, कुणी रामचंद्रराव असे म्हणे. पुढे त्यांना परमार्थातील परमाधिकार प्राप्त झाल्यावर लोक त्यांना रामभाऊमहाराज म्हणू लागले. पुढे त्यांनी चिमड गावी मठ स्थापन करून संप्रदाय सुरू केला, म्हणून ते चिमडमहाराज या नावाने ओळखले जाऊ लागले. प्रस्तुत ग्रंथात त्यांचेसाठी चिमडमहाराज हेच नाव वापरले आहे.

चिमडमहाराजांचे बालपण यरगट्टी गावातच गेले. तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. आठव्या वर्षी त्यांचे उपनयन झाले. बालपणापासूनच ते शिवाची उपासना करीत होते. ते ॐ नम: शिवाय या मंत्राचा जप करीत.

कुलपरंपरेप्रमाणे यरगट्टीकर कुटुंबातील सर्वजण प्रतिवर्षी सज्जनगडला जात. बालपणी चिमडमहाराज सज्जनगडावर गेले असता, एक उंचापुरा व तेज:पुंज रामदासी त्यांचेजवळ येऊन म्हणाला, ''बाळा, मी स्नान करण्यास जात आहे. मी स्नान करून परत येईपर्यंत, तू हा माझा दासबोध ग्रंथ सांभाळशील काय?'' तसे करण्याचे चिमडमहाराजांनी कबूल केले. दासबोधाची पोथी चिमडमहाराजांचे हातात ठेवून तो रामदासी जो गेला तो परत आलाच नाही. शोध घेऊनही त्याचा पत्ता लागला नाही. कसा लागणार त्याचा पत्ता? कारण तो रामदासी म्हणजे प्रगट झालेले साक्षात् रामदासस्वामीच होते. नंतर तो दासबोध घेऊन चिमडमहाराज परत आले आणि मग त्यांनी दासबोधाची पारायणे सुरू केली.

चिमडमहाराजांचे वडिल अंताजीपंत हे यरगट्टी गावी वकिली करीत होते. पण तेथे ती व्यवस्थित चालत नसल्याने, ते सातारा जिल्ह्यातील खानापूर गावी वकिली करण्यास गेले. तेव्हा चिमडमहाराजही वयाच्या अकराव्या वर्षी शिक्षणासाठी वडिलांजवळ रहाण्यास गेले. तेथे त्यांचा विद्याभ्यास चालू राहिला. खानापुरात शिक्षण चालू असतानाच चिमडमहाराजांचा विवाह झाला.

सातारा जिल्ह्यातच खानापूर-बलवडी हे गाव होते. तेथे बचारामपंत आणि सौ. येसूबाई हे दांपत्य रहात होते. या दांपत्यास इ. स. १८३९ साली एक कन्यारत्न झाले. ही कन्या म्हणजेच माई. माईच्या आईने



तिला लहानपणापासूनच घरकामात तरबेज केले होते. माईला आठवे वर्ष लागताच, त्या काळच्या प्रथेप्रमाणे तिच्यासाठी वरसंशोधन सुरू झाले. माईच्या मातापित्यांना चिमडमहाराजांचे स्थळ पसंत पडले. चिमडमहाराजांच्या आईवडिलांनाही माई ही सून म्हणून पसंत पडली. मग इ. स. १८४७ साली चिमडमहाराज आणि माई यांचा मंगलविवाह साजरा झाला. लग्नाचे वेळी माईचे वय होते आठ वर्षांचे आणि चिमडमहाराजांचे वय होते १४ वर्षांचे. सासरी माईचे नाव सीता असे ठेवण्यात आले.

विवाहानंतर इ.स. १८५७ साली चिमडमहाराज मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाले. लगेच त्यांना सातारा सबॉर्डिनेट जज्ज कोर्टात कारकुनाची नोकरी मिळाली. त्यांनी साताऱ्यात बिऱ्हाड केले. पण येथे पगार अपुरा असल्यामुळे त्यांनी ही नोकरी सोडून दिली आणि विटे नावाच्या गावी दुसरी नोकरी पत्करली. या विटे गावी असतानाच असे घडले :- निंबरगीकरमहाराज चिमडमहाराजांच्या झोपण्याच्या खोलीत रात्री प्रकट झाले, त्यांना सर्पदंशापासून वाचविले आणि परमार्थमार्गास लागण्याची सूचना केली.

विटे गावातील नोकरीतही घरखर्च व्यवस्थित भागेनासा झाला. तेव्हा तेथील चाकरीही चिमडमहाराजांनी सोडून दिली आणि मग त्या काळी अस्तित्वात असणाऱ्या जत नावाच्या संस्थानात नवीन नोकरी पत्करली.

जत संस्थानात नोकरी करीत असताना, कामाच्या निमित्ताने, चिमडमहाराजांना त्याच संस्थानातील उमदी नावाच्या गावी जावे लागे. त्यावेळी उमदी गावी रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचा मुक्काम होता.

साधुमहाराज हे निंबरगीकरमहाराजांचे मुख्य शिष्य होते. साधुमहाराज हे 'वाचासिद्‌ध साधु' म्हणून उमदीत प्रसिद्‌ध होते त्यांच्या दर्शनास चिमडमहाराज जात असत. त्यांची योग्यता लक्षात आल्यावर त्यांचेकडूनच परमार्थाचे मार्गदर्शन घ्यावे, असा विचार चिमडमहाराजांच्या मनात आला. त्याप्रमाणे त्यांनी साधुमहाराजांना उपदेश देण्याची विनंती केली. तेव्हा साधुमहाराजांना काय वाटले कोणास ठाऊक. त्यांनी चिमडमहाराजांना निंबरगीत असणाऱ्या निंबरगीकरमहाराज या आपल्या गुरूकडे त्यांना नेले. निंबरगीकरमहाराजांना पहाताच 'याच महात्म्यांनी आपणास सर्पदंशातून बचावले होते' हे चिमड महाराजांच्या लक्षात आले. त्यांनी धावत जाऊन निंबरगीकरमहाराजांच्या पायांना मिठी मारली. त्यांना उठवून निंबरगीकरमहाराजांनी खुणेचा प्रश्न केला, ''रामभाऊ, परमार्थमार्गाला लागला आहात की नाहीत?'' तेव्हा चिमडमहाराज नम्रपणे म्हणाले, ''महाराज, परमार्थाचे मार्गदर्शन मिळविण्यासच मी आलो आहे.'' ते ऐकताच निंबरगीकरमहाराज साधुमहाराजांना बोलले, ''साधुबुवा, मी तुम्हाला कथन केलेले परमार्थातील सिद्‌धसाधन तुम्ही या रामभाऊंना सांगा.'' त्याप्रमाणे साधुमहाराजांनी चिमडमहाराजांना सिद्‌धसाधनाचा उपदेश केला. तेव्हापासून चिमडमहाराजांनी परमार्थाची साधना चिकाटीने सुरू केली.

प्रपंचात राहूनच परमार्थ करावा, या निंबरगीकरमहाराजांच्या वचनाप्रमाणे, चिमडमहाराजांनी नोकरी करीतच संसार केला आणि परमार्थाची वाटचालही चालू ठेवली. चिमडमहाराज प्रथमपासूनच सद्‌गुणी आणि सदाचारी होते. आणि प्रथमपासूनच त्यांच्यावर सद्‌गुरूंनी कृपा केली होती. ते स्वत:ही साधनाचा झटून अभ्यास करीत होते. त्यामुळे



फार झपाट्याने त्यांची परमार्थात प्रगति झाली आणि त्यांना आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाला. परिणामत: त्यांना सर्वत्र आत्मस्वरूप/ब्रह्मस्वरूप दिसू लागले.

साधनेच्या जोडीने काही बाह्य आचारही चिमडमहाराजांनी पत्करला. तो म्हणजे दरवर्षी पौष महिन्यात निंबरगीस जाऊन निंबरगीकरमहाराजांचे दर्शन घेणे. निंबरगीस जाण्याच्या त्यांच्या नेमात त्यांना अनेक अडचणी आल्या. पण त्यांना न जुमानता त्यांनी हा नेम अखंडपणे पाळला आणि निंबरगीकरमहाराज विद्यमान असेपर्यंत नेम पाळण्यात कसूर केली नाही.

साधुमहाराजांच्या अनुग्रहानंतर साधारण तीन वर्षे चिमडमहाराजांनी जत संस्थानातील नोकरी केली. पुढे तीही नोकरी त्यांनी सोडली आणि सातारा जिल्ह्यातील मायणी सब्‌कोर्टात नोकरी धरली. काही काळानंतर त्यांनी ती नोकरीसुद्‌धा सोडून दिली आणि पुन: विटे या गावी सेवावृत्ति सुरू केली.

चिमडमहाराजांचे गुरु साधुमहाराज हे बालब्रह्मचारी होते. तेव्हा त्यांना पोसण्याचा भार एकाच व्यक्तीवर पडू नये, म्हणून निंबरगीकरमहाराजांनी त्यांना गावोगावी फिरत रहाण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे ते सतत फिरत असत. या आपल्या भ्रमंतीमध्ये ते दरवर्षी चिमडमहाराजांच्या घरी येत आणि आठपंधरा दिवस रहात. विटे येथे चिमडमहाराज व माईसाहेब यांचे बिऱ्हाड असताना, माईसाहेबांनी एका मुलीस जन्म दिला. तिचे नाव देवका असे ठेवण्यात आले.

इ. स. १८७८ चे प्रारंभी साधुमहाराज विटे गावी आले होते. त्याचवेळी सौ. माईसाहेब प्रसूत होऊन त्यांना मुलगा झाला. पण त्याचे नालच्छेदन व्यवस्थितपणे न झाल्यामुळे, रक्तस्राव होऊन तो मुलगा

दिवंगत झाला. तेव्हा आजूबाजूचे लोक साधुमहाराजांना नावे ठेवू लागले. ''अहो, असे कसले हे अपशकुनी साधु!'' असले शब्द कानांवर येताच साधुमहाराज सौ. माईसाहेबांना म्हणाले, ''सीतामाई, शोक करू नका. आत्ता गेला तो मुलगा प्रारब्धकर्मानुसार अल्पायुषी होता. तेव्हा खेद सोडा. आणि मी सांगतो ते ऐका. यानंतर तुम्हाला आणखी मुलगे व मुली होतील. आणि काही काळाने मी कायमचा तुमच्या जवळच वास्तव्यास येईन.'' साधुमहाराजांचे हे वचन भविष्यकालीन घटनांचे सूचक होते. म्हणजे भविष्यकाळात चिमडमहाराज आणि सौ. माईसाहेब चिमडास जाणार आणि तेथेच चिमडमहाराजांच्या रहाण्याच्या जागेजवळ साधुमहाराजांची समाधि होणार, याची सूचना साधुमहाराजांच्या शब्दांत होती.

आपल्या घरी साधुमहाराजांचा मुक्काम असताना सौ. माईसाहेबांना असे वाटले की साधुमहाराजांनी आपणासही उपदेशानुग्रह द्यावा. त्यांची इच्छा कळल्यावर साधुमहाराजांनी त्यांना अनुग्रह दिला आणि त्यांनी सौ. माईसाहेबांना बोध केला : ''सीतामाई, तुम्ही प्रपंचात राहूनच परमार्थ करा. सर्वांशी प्रेमाने वागा. जे आपणाजवळ आहे त्यातच समाधान माना. होईल तितका परोपकार करा. आपले वर्तन नेहमी चांगले असावे. चांगल्या वर्तणुकीचे सामर्थ्य फार मोठे असते. नेहमी खरे बोला. आळसाला अजिबात थारा देऊ नका. कारण तो प्रपंच आणि परमार्थ या दोहोंनाही घातक असतो. आळस टाकून आपले कर्तव्य कर्म करीत रहा.'' असे सांगून साधुमहाराजांनी सौ. माईसाहेबांना पूजेसाठी चांदीच्या पादुका दिल्या. तेव्हापासून सौ. माईसाहेब त्या पादुकांची पूजा करू लागल्या आणि साधुमहाराजांचा बोध लक्षात ठेवून तसे वागू



लागल्या आणि साधनाही करू लागल्या.

विटे येथील चिमडमहाराज व सौ. माईसाहेब यांचा निरोप घेऊन साधुमहाराज परत निघाले ते थेट चिमड गावी आले. इ. स. १८७८ सालीच त्यांनी देह ठेवण्याचे ठरविले होते व त्याप्रमाणे त्यांनी आपल्या भक्तांना सांगितले. त्यांच्या विरहाच्या कल्पनेने भक्तांना अत्यंत दु:ख झाले. त्यांनी नम्रपणाने आणि कळकळीने साधुमहाराजांची विनवणी केली, ''महाराज, आपण इतक्या लौकर आम्हांस सोडून जाऊ नये.'' भक्तांचा भाव आणि फार आग्रह पाहून साधुमहाराजांचे कोमल मन विरघळले. ते म्हणाले, ''सज्जनहो, तुमच्या आग्रहानुसार मी या वर्षी देह ठेवण्याचा माझा बेत रहित करतो. पण एक लक्षात घ्या. यापुढे काही झाले तरी मी पुढच्या वर्षी देहत्याग करणारच. त्यावेळी तुम्ही लोकांनी कितीही आग्रह केला तरी मी माझा निश्चय बदलणार नाही.'' नाइलाजाने भक्तांनी ते मान्य केले.

यथाक्रमाने इ. स. १८७९ साल आले. यावेळी साधुमहाराज चिमड गावीच गुराप्पा औरसंग या भक्ताच्या घरी मुक्कामास होते. त्यांनी सर्वांना सांगून सवरून चैत्र शुद्ध ३, शके १८०१ (इ.स. १८७९) या दिवशी महानिर्वाण केले. तत्पूर्वी त्यांच्या भक्तांनी त्यांना विचारले होते, ''महाराज, आपण आता जाणार आहात. पण आपण गेल्यावर आम्ही कुणाकडे पहावे? आम्हाला कोण मार्गदर्शन करील?'' त्यावर उत्तरादाखल साधुमहाराज म्हणाले होते, ''सज्जनहो, ऐका. माझे एक अधिकारसंपन्न शिष्य रामभाऊ यरगट्टीकर हे सध्या विटे या गावी नोकरी करीत आहेत. मी इहलोक सोडल्यावर, तुम्ही त्यांच्याकडे जावा. त्यांना माझा निरोप सांगा. आणि त्यांना येथे चिमडला रहाण्यास घेऊन या आणि त्यांच्या

राहण्याची व्यवस्था करा.''

साधुमहाराजांच्या या वचनाला अनुसरून, साधुमहाराजांच्या निर्वाणानंतर महालिंगपुर आणि चिमड येथील काही भक्त विटे गावी गेले आणि त्यांनी साधुमहाराजांचे वचन त्यांच्या कानी घातले आणि शेवटी चिमडास येण्याची विनंती केली. ते ऐकताच चिमडमहाराजांच्या मनात आले, ''चिमडास जायचे म्हणजे इथली नोकरी सोडावयास हवी. चिमड हे परके गाव. तेथे आपले बस्तान बसेल की नाही?'' तेव्हा ते त्या भक्तांना म्हणाले, ''आपली विनंती मला कळली. मला विचार करण्यास थोडा अवधि द्या. मग मी आपणास काय ते कळवितो.'' असे सांगून त्यांनी त्या भक्तांना परत पाठविले.

इ. स. १८७९ च्या चैत्र महिन्यातील साधुमहाराजांच्या निर्वाणानंतर त्याच सालच्या पौष महिन्यात चिमडमहाराज हे दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे निंबरगीस गेले. निंबरगीकरमहाराजांचे दर्शन झाल्यावर, त्यांनी साधुमहाराजांच्या भक्तांनी केलेली विनंति आणि त्यांनीच सांगितलेले साधुमहाराजांचे वचन निंबरगीकरमहाराजांना सांगितले. निंबरगीकरमहाराज हे त्रिकालदर्शी होते. चिमड गावी राहूनच रामभाऊ यरगट्टीकर हे साधुमहाराजांची समाधि बांधून चिमड संप्रदाय सुरू करणार हे त्यांना ज्ञात होते. म्हणून ते रामभाऊ यरगट्टीकरांना म्हणाले, ''रामभाऊ, साधुमहाराजांचे वचन मला योग्य वाटते. तुम्ही त्यांच्या वचनाप्रमाणे वागावे. आणि मला विचाराल तर तुम्ही चिमड गावीच रहावयास जावे असे मलाही वाटते.'' ''महाराज, ठीक आहे. आपल्या व साधुमहाराजांच्या वचनाप्रमाणे मी वागतो,'' असे सांगून चिमडमहाराज विटे गावी परत आले.

विटे गावी आल्या आल्या त्यांनी निंबरगीकरमहाराजांचे वचन सौ. माईसाहेबांना सांगितले आणि ''आता आपणास चिमड गावी जावे



लागणार,'' असे ते म्हणाले. त्यावेळी सौ.माईसाहेबांच्या मनात आले, ''विटे गाव सोडून कायमचे चिमड येथे जावयाचे? चिमड हे कर्नाटकातील एक खेडे. तेथे आसपास सर्व कानडी मुलूख. आपण मराठी. बरे, तेथे जाऊन करायचे काय? तेथे आपल्या पतीला नोकरी मिळेल काय?'' इत्यादि प्रश्नांनी सौ. माईसाहेब यांच्या मनात घर केले. पण सौ. माईसाहेब विचारी होत्या. त्यांच्या मनात पुन: विचार आला, 'आपले गुरु साधुमहाराज, त्यांचे गुरु निंबरगीकरमहाराज आणि आपले पति रामभाऊ यांना आपण चिमडास जावे असे वाटत आहे. त्यात सद्‌गुरूंचा काही खास हेतु असणार! तेव्हा आपण चिमडास जाण्याच्या पतीच्या बेताचे आड कशास यावे? गुरुजनांची आज्ञा मोडावयाची नसते. तसेच साधुमहाराज, इत्यादींना असे वाटत असावे की चिमडास जाण्यातच आपले कल्याण आहे. म्हणूनच आपण चिमडास जावे असे त्यांनी सुचविले असणार. ईश्वरेच्छा बलीयसी असते आणि सर्व काही ईश्वरी इच्छेने घडते असे साधुमहाराज सांगत असतच. तेव्हा चिमडला जाण्याच्या पतीच्या निश्चयाच्या आड मी कशाला जाऊ?' असा सर्व विचार करून सौ. माईसाहेबांनी पतीच्या बेतास संमति दिली. आपल्या बेताला पत्नीचा विरोध नाही हे पाहून चिमडमहाराजांनाही आनंद झाला.

प्रथम त्यांनी आपल्या नोकरीचे त्यागपत्र दिले. नंतर व्यवसायातील देण्याघेण्याची सर्व व्यवस्था केली आणि अन्य निरवानिरव केली. नंतर आपली पत्नी सौ. सीता, देवका नावाची मुलगी आणि बसपराप्पा मुत्तूर नावाचा एक विश्वासू सेवक यांना बरोबर घेऊन, चिमडमहाराजांनी चिमडास कायमचे जाण्यास प्रस्थान ठेवले. पुढे चिमडास राहू लागल्यावरच, चिमडमहाराज व सौ. सीता या दांपत्याला दाजीसाहेब हे पुत्ररत्न झाले.

****

# प्रकरण २

ज्या चिमड गावी साधुमहाराजांनी निर्वाण केले होते आणि ज्या चिमड गावी आता चिमडमहाराज कायमच्या वास्तव्यास जाणार होते, ते चिमड गाव काय आणि कसे होते? त्या काळी चिमड हे कर्नाटकातील एक फुटके खेडे होते. तेरदाळ गावापासून महालिंगपुर गावी जाण्याच्या वाटेवर तीन मैल अलीकडे चिमड होते. महाराष्ट्रातून चिमडला जायचे झाल्यास, त्या काळी सदर्न मराठा (सध्याच्या साऊथ सेंट्रल) रेल्वेच्या कुडची नामक स्टेशनावर उतरून प्रथम तेरदळला जावे लागे. कुडचीहून तेरदळ १६ मैल, तेरदळहून रबकवी गाव ४ मैल आणि तेथून चिमड ३ मैल असे हे प्रवासाचे टप्पे असत. त्या जुन्या काळी हा सर्व प्रवास पायी अथवा बैलगाडीने करावा लागे. क्वचित् कुडचीहून भाड्याच्या मोटारी मिळत असत.

या चिमड गावात नाव घेण्यासारखे असे काहीही नव्हते. ते शिक्षणाचे केंद्र नव्हते; कलाकौशल्याचे स्थान नव्हते; कोणताही व्यापार अथवा अन्य उद्योग नव्हता. सृष्टिसौंदर्य म्हणावे तर तेही नव्हते. अशा या चिमड गावी आता चिमडमहाराज रहाण्यास जाणार होते. ''आम्ही सहकुटुंब चिमडला येत आहोत,'' असे चिमडमहाराजांनी चिमडच्या भक्तांना कळवले, तेव्हा साधुमहाराजांच्या वचनाप्रमाणे त्यांची रहाण्याची सोय करायचे चिमडच्या भक्तांनी ठरविले. त्यांनी चिमडमहाराजांच्या रहाण्यासाठी एक जागा मुक्रर केली, ती अशी :- चिमड गावच्या पूर्व/आग्नेय दिशेला एक ओढा होता. त्या ओढ्याचे पलीकडे पूर्वी वापरात असणारे पण सध्या पडीक असणारे एक स्मशान होते. हे स्मशान चिमडच्या लोकांनी



चिमडमहाराजांच्या निवासासाठी निश्चित केले. त्या जागेवर एक खोपट/ पर्णकुटी बांधली आणि तसे चिमडमहाराजांना कळविले.

वरील जागेस चिमडमहाराजांनी मान्यता दिली. कारण या जागेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य चिमडमहाराजांना पूर्वी कळलेले होते ते असे :- पूर्वी एकदा निंबरगीकरमहाराज हे आपल्या लक्ष्मीबाई अक्का या शिष्येसह फिरत फिरत या चिमड गावाजवळील पडीक ओसाड स्मशानात आले होते. भविष्यदर्शी निंबरगीकरमहाराजांना या जागेचे भावी महत्त्व लक्षात आले. म्हणून त्यांनी त्या जागेवर कापूर लावला. मग ते लक्ष्मीबाई अक्कांना म्हणाले, ''अक्का, तूही आता तुझ्या हाताने या पेटलेल्या कापरात आणि कापूर घाल.'' तेव्हा लक्ष्मीबाई अक्का निंबरगीकरमहाराजांना म्हणाल्या, ''महाराज, तुम्ही येथे कापूर का लावला? आणि तुम्ही कापूर लावल्यावर मी पुन्हा कशासाठी कापूर येथे टाकावयास हवा?'' त्यावर निंबरगीकरमहाराज बोलले, ''अक्का, तू प्रथम कापूर घाल. मग मी तुझ्या प्रश्नांची उत्तरे देतो.'' निंबरगीकरमहाराजांच्या सूचनेप्रमाणे लक्ष्मीबाई अक्कांनी कापूर घातल्यावर, निंबरगीकरमहाराजांनी खुलासा केला, ''अक्का, ही जुन्या स्मशानाची जागा आज ओसाड व पडीक दिसते आहे. पण लक्षात ठेव आणखी काही काळानंतर या जागेला ऊर्जितावस्था आणि महत्त्व येणार आहे. याच स्थानी एका साधुपुरुषाचे समाधिमंदिर उभे राहणार आहे आणि त्याच्या शेजारीच दुसऱ्या एका साधूचा मठ होणार आहे. अक्का, आणखी एक गोष्ट लक्षात ठेव. मी या इहलोकातून निघून गेल्यावर तुलासुद्‌धा येथील मठात रहावयास यावे लागणार आहे. असे या स्थानाचे माहात्म्य आहे. म्हणून मी येथे कापूर लावला.'' असे लक्ष्मीबाई अक्कांना सांगून निंबरगीकरमहाराजांनी त्या

पडीक स्मशानातील काही भाग रेखांकित केला.

हा सर्व पूर्ववृत्तांत लक्ष्मीबाई अक्कांच्या तोंडून चिमडमहाराजांनी पूर्वी ऐकलेला होता. तेव्हा आता त्या स्मशानातच चिमडच्या लोकांनी आपणासाठी पर्णकुटी बांधली आहे, हे कळल्यावर चिमडमहाराज विनातक्रार तेथे रहावयास कबूल झाले यात नवल नव्हते. रामायणातील सीता आपल्या राम या पतीबरोबर वनात वास करण्यास गेली तर आता सौ. सीता ही आपल्या रामचंद्र या पतीबरोबर स्मशानात वास करण्यास येणार होती. इ. स. १८८० च्या प्रारंभी चिमडमहाराज चिमडात आले. चिमडच्या भक्तांनी त्याचे आगतस्वागत केले. त्यानंतर त्यांनी त्यांना त्या पूर्वीच्या स्मशानातील पर्णकुटीत नेऊन सोडले.

त्या पर्णकुटीत राहू लागल्यावर, आपल्या पर्णकुटीच्या जवळच साधुमहाराजांची समाधि बांधवून घेण्याचे चिमडमहाराजांनी ठरविले. त्या गोष्टीस चिमड गावातील भक्तांची संमति मिळाली. या समाधिमंदिराच्या बांधकामासाठी लागणाऱ्या खर्चासाठी चिमडच्या भक्तांनी चिमड, महालिंगपुर, रबकवी, जमखंडी इत्यादी जवळपासच्या गावांतील भक्तभाविकांकडून वर्गणीवजा द्रव्य गोळा केले. महत्त्वाची गोष्ट अशी की त्या भक्तांनी संतोषपूर्वक समाधीच्या उभारणीसाठी भरपूर द्रव्यसाहाय्य केले.

त्यानंतर साधुमहाराजांच्या समाधीचे बांधणीसाठी पाया खोदण्यास प्रारंभ झाला. पाच हात खणून होताच, वैशाख वद्य ३, शके १८०२ (इ. स. १८८०) या दिवशी पांढऱ्या शुभ्र स्वच्छ पाण्याचा जिवंत झरा उसळून आला. हे कळताच चिमडमहाराज उद्‌गारले, ''निंबरगीकरमहाराजांच्या इच्छेने साक्षात् गंगा भागीरथीच साधुमहाराजांच्या दर्शनास आली आहे.'' पुढे ते असेही बोलून गेले, ''या गंगेच्या पाण्याला विटाळ न झाल्यास या गंगोदकाने रोगराई दूर होईल.'' आणि



त्यांच्या या वचनाप्रमाणे या भागीरथीच्या पाण्याने रोग दूर होण्याचे अनुभव पुढे अनेक माणसांना आले.

स्मशानभूमीत गंगा आली ही घटना चिमडमहाराजांनी निंबरगीकरमहाराजांना कळविली. मग त्यांच्या आज्ञेवरून या गंगाजलाभोवती एक सुंदर विहीर बांधून घेण्यात आली आणि तिला 'तापनाशी तीर्थ' असे नाव देण्यात आले. नंतर या तापनाशी तीर्थाच्या मध्यभागी पाण्यातच चिमडमहाराजांनी एक चतुष्कोनाकृति मंदिर बांधवून घेतले. आणि या मंदिरात साधुमहाराजांच्या पादुका, निंबरगीकरमहाराजांचे नावाची पिंडी आणि निंबरगीकरमहाराजांचे गुरु जे काडसिद्ध त्यांचे नावाचा बाण अशा तीन वस्तूंची स्थापना करण्यात आली. मार्गशीर्ष वद्य ७, शके १८०३ (इ. स. १८८१) हा स्थापनेचा दिवस होता. ''साधुमहाराजांचे दर्शनास नित्य श्रीदत्त, मत्स्येंद्रनाथ, गोरखनाथ इत्यादि महान् सिद्धपुरुषांचे आगमन होत आहे (कैवल्य पुरुष खंड-१, पृ.८४). या तापनाशी तीर्थाचे महत्त्व सांगणाऱ्या काही आर्या चिमडमहाराजांना स्फुरल्या त्या अशा :-

ऐका भाविक जनहो साधूच्या दर्शना आली गंगा ।
या तापनाशी तीर्थी साधूच्या दर्शना आली गंगा ।।१।।
तापा हीच निवारी म्हणवुनि हिज तापनाशी हे नाम ।
सलिली हिच्या नहाता अघ नासुनी सफल करीतसे काम ।।२।।
रोगादि व्यथा जाऊनि दिव्य करी देह मार्जने एका ।
स्नाता कोटिगुणे फल देऊन मोक्षासी नेई जनलोका ।।३।।
ऐशी माता गंगा आली जनलोक उद्धरायाला ।
भ्याला काय अघाला न्हाला तो मुक्त होऊनि गेला ।।४।।

सद्‌गुरुप्रसाद वरदे चिमडपुरी गुप्त वास हा केला ।
रघुनाथप्रिय माझा कैवारी उभाचि *दास* हाकेला ।।५।।

तापनाशी तीर्थांतील साधुमहाराजांच्या पादुकाची पूजाअर्चा, उपासना हा मुख्य कार्यक्रम होता. तथापि दर्शनास येणाऱ्या भक्तांच्या लाभासाठी चिमडमहाराजांनी अन्य काही कार्यक्रम सुरू केले :- पहाटे पादुकांची काकड आरती होई मग सकाळी पादुकांची पूजा होई. दिवसाच्या तिसरे प्रहरी चिमडमहाराज पोथी अथवा पुराण सांगत. संध्याकाळी धूपारती झाल्यावर पंचपदी (पाच पदांचा समूह) म्हटली जाई. या नित्य कार्यक्रमाच्या जोडीने पुढील नैमित्तिक कार्यक्रम साजरे केले जात :- श्रावण महिन्यात दर सोमवारी रात्री पालखी प्रदक्षिणेचा कार्यक्रम होई. चैत्र शुद्‌ध प्रतिपदा ते चैत्र शुद्‌ध तृतीया या तीन दिवसांत साधुमहाराजांच्या आराधनेचा कार्यक्रम हा निंबरगीकरमहाराजांनी सांगितलेल्या पद्‌धतीप्रमाणे केला जाई. तसेच निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेनुसार गुरुद्वादशी (आश्विन वद्य १२) ते पांडव पंचमी (कार्तिक शुद्‌ध ५) या दिवाळीच्या ऐन कालावधीत साधुमहाराजांच्या रथोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरा केला जाई. या रथोत्सवाच्या समारंभात सकाळी काकडारती आणि भूपाळी झाल्यावर, पादुकांची पूजा होई. नंतर दासबोध या ग्रंथराजाचे पठण, नंतर भजन अथवा कीर्तन असे. सायंकाळी पंचपदी झाल्यावर आणि साधुमहाराजांची पालखी झाल्यानंतर, शेजारती केली जाई. पांडव पंचमी या मुख्य दिवशी रथोत्सव असतो. या दिवशी संध्याकाळी पाचच्या सुमारास साधुमहाराजांचा रथ मोठ्या थाटामाटाने मठातून बाहेर पडे; मग तो चिमड गावातून जाई आणि नंतर तो साधुमहाराजांच्या दहनभूमीवरील वटवृक्षापर्यंत जाऊन परत फिरे. परत



आल्यावर साधुमहाराजांच्या मंदिराभोवती रथाच्या तीन प्रदक्षिणा होत आणि हा कार्यक्रम समाप्त होई.

वरील नित्यनैमित्तिक कार्यक्रमांत भक्तांचा सहभाग असे.तथापि भक्तांनी साधन करण्यावर भर दिला पाहिजे असे चिमडमहाराज भक्तांना सांगत.

उत्सवाचे काळात तसेच इतर दिवशीही अन्नसंतर्पण होत असे.

वर सांगितल्याप्रमाणे चिमडमहाराज इ. स. १८८० च्या प्रारंभास चिमड गावच्या जुन्या स्मशानातील पर्णकुटीत रहाण्यास आले होते. तेथे ते असतानाच इ. स. १८८० साली त्यांच्या पत्नी सौ. सीताबाई अर्थात माईसाहेब प्रसूत झाल्या आणि त्यांना एका पुत्राचा लाभ झाला. हा पुत्र म्हणजेच दाजीबा अथवा दाजीसाहेब. या पुत्राच्या जन्माच्या संदर्भात कैवल्यपुरुष, खंड-१, सांगली, १९३३ या ग्रंथात पृष्ट १३४-१३५ वर पुढील हकीकत सापडते :-

*निंबरगीकरमहाराजांचा दाजीबा देशपांडे नावाचा एक अनुगृहीत होता. तो उमदी या गावी रहात असे. त्याची पत्नी निवर्तली. त्यानंतर तो निंबरगीकरमहाराजांचेकडे आला. 'समर्थांच्या (= निंबरगीकरमहाराजांच्या) पायांवर डोके ठेवून दाजीबाने विनंती केली की, ''आजपर्यंत मी आपल्या आश्रयाखाली होतो. आता मी एकलकोंडा राहिलो. आता मजकडून जगात राहवत नाही. मला जाणेस कृपा करून आज्ञा द्या,'' म्हणताच ''बरे जा,'' असे समर्थांनी सांगितले (पृ. १३४).*

*नंतर दाजीबा उठून आपल्या गावी गेले. दुसरे दिवशीच त्यांचा शेवट झाला, अशी वार्ता निंबरगीस आली. तेव्हा त्याजबद्दल समर्थांजवळ असणाऱ्या सर्व लोकांना हळहळ वाटली. तेव्हा समर्थ म्हणाले की, ''त्याचे निम्मे साधन झाले असून, साधनपूर्तता करण्यास पुन: तो कर्मभूमीवर येणार आहे. त्याबद्दल का काळजी करता?'' जवळची*

*मंडळी बोलली की, ''या दाजीबाचे कुटुंब व सासूसासरे वगैरे सर्वच मंडळी चांगली माणसे होती. अशी माणसे पुन: कशी मिळतील?'' ते ऐकून समर्थ बोलले की, ''अशीच चांगली माणसे पुढे मिळतील. पुढे जगून राहतील ती माणसे याची प्रचीती पहातील.'' या समर्थांच्या वचनाप्रमाणेच पुढे योग घडून आला (पृ. १३५). सदर दाजीबाचा तिकडे शेवट होताच, पुढे १०-११ महिन्यांनी चिमडचेमहाराजांना चिमड मुक्कामी पुत्ररत्न झाले (कैवल्य पुरुष, खंड-१, पृ. १३५).*

चिमडमहाराजांच्या या मुलाचा जन्म होतानाच बाळंतिणीच्या खोलीत प्रकाश पडला. तो सूर्य, चंद्र, अग्नि, विद्युत् यांच्या प्रकाशासारखा नसून वेगळाच होता. आणखी असे :- उपजताच या मुलाच्या डोक्यावर केस होते आणि ते एखाद्या जटाधारी तपस्वी पुरुषाच्या केसाप्रमाणे भरपूर आणि लांबसडक होते, इतके की त्या केसाखाली मुलाचे डोळे झाकून गेले होते. तेव्हा या मुलाला डोळेच नाहीत की काय अशी शंका आली. ती दूर करण्यास केस बाजूला सारण्यात आले. तेव्हा मुलाचे पाणीदार आणि अत्यंत तेजस्वी डोळे सर्वांना दिसून आले. सर्वांनी सुटकेचा सुस्कारा सोडला. आणि असे की या मुलाच्या जातकाप्रमाणे हा मुलगा अल्पायुषी होता.

या मुलाचा जन्म होण्यापूर्वीच निंबरगीकरमहाराजांचा चिमडमहाराजांना निरोप आलेला होता की, ''सौ. सीताबाईंना पुत्र झाल्यावर, त्याला पहिले दहा दिवस आईजवळ फारसे नेऊ नका.'' आता दहा दिवस या मुलाला सांभाळण्यास चिमड मठात अन्य कोणी जबाबदार स्त्री असणार नाही, हे लक्षात घेऊन निंबरगीकरमहाराजांनीच आपली लाडकी शिष्या लक्ष्मीबाई अक्का हिला चिमड मठात पाठवून दिले होते. या लक्ष्मीबाई अक्कांनीच पहिले दहा दिवस या नूतन बालकाचा यथायोग्य सांभाळ



केला. हे मूल नेहमीपेक्षा जरा जास्तच रडवे होते. परंतु लक्ष्मीबाई अक्कांनी त्याची नीट काळजी घेतली. पुढे दहा दिवस झाल्यावर, त्या बाळाला सौ. सीताबाईंच्या/माईसाहेबांच्या स्वाधीन करून लक्ष्मीबाई अक्का निंबरगीस परत गेल्या. महत्त्वाची गोष्ट अशी की या पहिल्या दहा दिवसांतच मूल चांगले टुकटुकीत होते आणि बसविले तर ते नीट बसत असे.

मुलाच्या जन्मानंतर बारावा दिवस आला. या दिवशी मुलाचे बारसे करण्यात आले. बारश्याचे दिवशी या अर्भकाला रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे 'रघुनाथ' हे नाव ठेवण्यात आले. मुलाला पाळण्यात ठेवून नामकरण करताना सौ. सीताबाई पाळणा गाऊ लागल्या :-

*जो जो जो जो रे, रघुनाथा, गोपाळा, गोविंदा ।।ध्रु.।।*
*पाळणा आणीला, तुजसाठी, विश्रांति घेण्यासी ।।१।।*
*निद्रेची देवी, तुजलागी, निद्रा आणू दे ।।२।*
*बाळा रघुनाथा, निश्चिंता, झोपी तू जाई ।।३।।*

त्यानंतर दुसऱ्या एका सवाष्णीने पाळणा गाईला :-

*जो जो जो जो रे रघुनाथा, नीज तू वेगी आता ।।ध्रु.।।*
*जागृतिमाझारी, रघुनाथा, शीण बहु तुज आला ।।१।।*
*पालख हा छान, रघुनाथा, गाणे मी गाईन ।।२।।*
*पालख हलविते, रघुनाथा, निद्रा करी आता ।।३।।*

सौ. माईसाहेबांचा हा मुलगा चांगला गोरागोमटा होता. म्हणून त्याला दृष्ट लागली अशी एक दिवस सौ. माईसाहेबांना शंका आली. त्या दिवशी त्यांनी पुढील गाणे म्हणून मुलाची दृष्ट काढली :-

*खरी झाली दृष्ट माझ्या रघुनाथाला वाटते ।*
*दचदचकुनी लेकरू गं तीनतीनदा उठते ।।*
*दिवसामाझारी बहु लोक तुज झाले पहाते ।*

*मीठमोहरी उतरुनी दृष्ट तुझी मी काढते ।।*

रघुनाथ बाळाला निंबरगीकरमहाराजांच्या पायांवर घालून, त्यांचा शुभ आशीर्वाद घ्यावा, या इच्छेने चिमडमहाराज व सौ. माईसाहेब लौकरच निंबरगीस गेले. रघुनाथाला निंबरगीकरमहाराजांच्या पायांवर ठेवण्यात आले. त्यावेळी सौ. माईसाहेब/सीताबाई निंबरगीकरमहाराजांना म्हणाल्या, ''महाराज, माझे हे मूल वाजवीपेक्षा जास्त रडते आहे. त्याला काय करावे?'' तेव्हा निंबरगीकरमहाराजांनी त्यांना विचारले, ''सीताबाई, या मुलाचे नाव काय ठेवले आहे?'' ''रघुनाथ हे साधुमहाराजांचे नाव,'' असे सौ. सीताबाई म्हणाल्या. त्यावर निंबरगीकरमहाराज बोलले, ''सीताबाई, तुम्ही लोक आता या मुलाला रघुनाथ नावाने न हाकारता, त्याला 'दाजीबा' या नावाने हाक मारीत जा म्हणजे त्याचे जादा रडणे बंद होईल.'' महाराजांच्या आज्ञेनुसार त्यानंतर सर्वांनी त्या मुलाला 'दाजीबा' या नावाने हाक मारण्यास प्रारंभ केला. तसे करताच मुलाचे जादा रडणे बंद झाले.

त्यानंतर निंबरगीकरमहाराजांनी त्या मुलाला आपल्या मांडीवर ठेवण्यास सांगितले. त्यांनी मुलाच्या मस्तकावरून आपला वरदहस्त फिरविला. नंतर मुलाला आपल्या पोटावर बसवून घेतले व मुलाकडे पाहून, ''मृत्युलोकीची हवा घेणेकरिता पुन: आलास काय, बाबा? आता येथे पुढे काय करणार?'' असा प्रश्न (निंबरगीकरमहाराजांनी) केल्यावर, निंबरगीकरमहाराजांच्या मुखाकडे पाहून मूल हसू लागले (कैवल्यपुरुष, खंड-१, पृ. १३६).

निंबरगीहून परत आल्यावर 'दाजीबा' यथाक्रम उपडा होऊ लागला, रांगू लागला, हळूहळू उभे राहू लागला आणि त्याने पावले पुढे टाकण्यास आरंभ केला. मठात येणाऱ्या भक्तांचा तो कौतुकाचा विषय बनला. हा



मुलगा देवाच्या होणाऱ्या कार्यक्रमांत स्वस्थ बसून भागही घेऊ लागला.

इकडे 'दाजीबा' जसजसा वाढत होता तसतसा चिमडमहाराजांचा परमार्थाचा पसाराही वाढू लागला होता. चिमड येथील साधुमहाराजांच्या देवस्थानाची कीर्ति वाढत चालली. अनेक जण चिमडमहाराजांचे अनुगृहीत बनले. चिमड, रबकवी, महालिंगपुर, जमखंडी, मुधोळ, विजापुर, बेळगाव, नाशिक, धारवाड, बेंगळूर, म्हैसूर, तंजावर, सांगली, कोल्हापुर, वसगडे, तासगाव, सातारा, पुणे, मुंबई, काशी इत्यादि ठिकाणी चिमडमहाराजांचे अनुगृहीत पसरले होते. या अनुगृहीतांमध्ये ब्रह्मचारी लोक, वेदशास्त्रज्ञ, पुराणिक, विश्वविद्यालयातील उच्च पदवीधारक, इंजिनिअर, डॉक्टर, वकिल वगैरे लोक, सरकारी सेवक, व्यापारी, स्मार्त आणि भागवत लोक, मध्व संप्रदायी, बौद्धधर्मी व जैनधर्मी लोक, लिंगायत, पांचाळ तसेच नाना मतांचे लोक होते. खेरीज गिरी, पुरी, भारती इत्यादी नावे असणारे गोसावीही होते. हे लोक वर्षातून केव्हाही साधुमहाराजांचे दर्शनास येत. त्यांना चिमड मठात भोजनासाठी मुक्तद्वार असे.

खेळत, बागडत, मठातील धार्मिक कार्यक्रमांत हजेरी लावत, दाजीबा चार वर्षांचा झाला. वर्ष होते इ. स. १८८४. या वर्षीच्या पौष महिन्यात चिमडमहाराज नेहमीप्रमाणे निंबरगीस गेले होते. त्यावेळी त्यांना असे कळले की निंबरगीकरमहाराज हे आपल्या निर्वाणापूर्वीची निरवानिरव करीत आहेत. त्याचा एक भाग म्हणून निंबरगीकरमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्कांना आज्ञा केली, ''अक्का, रामभाऊ जेथे उतरले आहेत तेथे जा आणि माझ्या वतीने सर्व परमार्थ त्यांच्याकडे सोपव.'' अक्कांनी त्याप्रमाणे केले. त्या परत आल्यावर निंबरगीकरमहाराजांनी त्यांना प्रश्न केला, ''अक्का, या परमार्थापासून तुमचा लखलाभ होऊ दे, असे तू रामभाऊंना म्हणालीस की नाही?'' त्यावर अक्का 'नाही' म्हणाल्या. तेव्हा

निंबरगीकरमहाराज बोलले, ''अक्का, पुन: रामभाऊकडे जा आणि तसा आशीर्वाद देऊन ये.'' त्याप्रमाणे लक्ष्मीबाई अक्का पुन: चिमडमहाराजांचे मुक्कामाचे स्थानी गेल्या आणि तसा आशीर्वाद देऊन परत आल्या.

त्यानंतर चिमडमहाराज हे निंबरगीकरमहाराजांचे दर्शनास गेले. त्यांच्या पदरात निंबरगीकरमहाराज नारळ घालू लागले. तेव्हा लक्ष्मीबाई अक्का महाराजांना म्हणाल्या, ''महाराज, नुसता नारळ त्यांचे पदरात घालू नका. प्रथम त्यांच्या मस्तकावरून हात फिरवा आणि आशीर्वाद द्या की तुम्ही, तुमची मुले, तुमचे नातू या सर्वांना परमार्थाचा लखलाभ होऊ दे.'' ते ऐकताच, ''या आमच्या मुलीचे ऐकलेच पाहिजे,'' असे म्हणून निंबरगीकरमहाराजांनी तसा आशीर्वाद देऊन, चिमडमहाराजांचे पदरात नारळ घातला. इतकेच नव्हे तर, ''आमचा जीव चिमडास राहील व तुम्ही स्मरण कराल त्यावेळी आम्ही दर्शन देत जाऊ,''असे आश्वासनही निंबरगीकरमहाराजांनी चिमडमहाराजांना दिले (कैवल्य पुरुष, खंड १, पृ. १३८). याप्रमाणे चिमडास चिमड मठात निंबरगीकरमहाराजांचा वास झाला आहे.

यानंतर निंबरगीकरमहाराजांनी आपल्या अनुगृहीतांना सांगितले, ''यापुढे परमार्थाची पुंजी चिमडास गेली. जे काय विचारायचे ते चिमडास जाऊन विचारावे'' (कैवल्य पुरुष, खंड-१, पृ. १४१).

दाजीबांना/दाजीसाहेबांना इ. स. १८८५ साली पाचवे वर्ष लागत होते. याच वर्षी निंबरगीकरमहाराजांनी महानिर्वाण करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे शुक्रवार, चैत्र शुद्ध १२, शके १८०७ (इ.स. १८८५) रोजी निंबरगीकरमहाराजांनी इहलोकीची यात्रा संपविली. निर्वाण केल्यावर निंबरगीकरमहाराजांनी गर्भवती असणाऱ्या सौ. माईसाहेबांना- चिमडमहाराजांच्या पत्नींना - दर्शन दिले होते. म्हणून त्यांच्या प्रसूतीनंतर



त्या मुलाचे 'नारायण' असे नाव ठेवण्यात आले. नारायण हे निंबरगीकरमहाराजांचे नाव होते. नारायणाचा जन्म चैत्र वद्य १४, शके १८०७ (इ.स. १८८५) या दिवशी झाला होता. इ. स. १८८० ते इ. स. १८८५ या दरम्यानच्या काळात, सौ. माईसाहेबांना एक मुलगी झाली होती आणि तिचे नाव 'बहिणा' असे ठेवण्यात आले. अशाप्रकारे दाजीसाहेबांना एक धाकटी बहीण आणि एक धाकटा भाऊ झाला होता.

निंबरगीकरमहाराजांच्या निर्वाणानंतर लक्ष्मीबाई अक्कांचा आधार गेला होता. त्या अगदी पोरक्या झाल्या होत्या. त्यांना निर्वाणापूर्वी निंबरगीकरमहाराजांनी सांगून ठेवले होते की, ''माझ्या निर्वाणानंतर तू रामभाऊ यरगट्टीकर यांच्या चिमड मठात रहाण्यास जा. रामभाऊ तुझा सांभाळ करतील.'' निंबरगीकरमहाराजांचे निर्वाणाची वार्ता कळताच चिमडमहाराज निंबरगीस गेले व त्यांनी यथाशक्ति महाराजांच्या कुटुंबाचे सांत्वन केले. त्यानंतर ते लक्ष्मीबाई अक्कांच्या बिऱ्हाडी गेले. अक्का शोकाकुल होत्या. चिमडमहाराजांनी त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर ''अक्का, आता तुम्ही मजबरोबर चिमडास चला,'' अशी त्यांनी त्यांना विनंति केली. ती विनंति आणि निंबरगीकरमहाराजांचे वचन लक्षात घेऊन, लक्ष्मीबाई अक्का चिमडास रहाण्यास आल्या. आणि आपल्या निर्वाणापर्यंत त्या चिमड मठातच राहिल्या. चिमडमहाराजांचे नंतर या लक्ष्मीबाई अक्कांनीच दाजीसाहेबांच्या परमार्थाची काळजी वाहिली.

****

# प्रकरण ३

दिवसेंदिवस सत्पुरुष म्हणून चिमडमहाराजांची कीर्ति पसरत चालली होती. ती मुधोळ या गावीही पसरली होती. साहजिकच मुधोळ गावची काही मंडळी ही इ. स. १८८६-१८८८ या काळात चिमडमहाराजांचे शिष्य बनली. हा प्रकार असा घडून आला :- मुधोळ गावात श्री. बाबासाहेब मुजुमदार या नावाचे एक गृहस्थ न्यायाधीश या पदावर होते. ते मूळचे सांगली या गावचे. कारणपरत्वे ते सांगलीस जात येत असत. त्यांचा हा प्रवास त्याकाळी घोड्यावरून होत असे. वाटेत ते विश्रांतीसाठी चिमड मठात थांबत असत. प्रथम त्यांना चिमडमहाराजांचा परमार्थिक अधिकार माहीत नव्हता. साहजिकच ते चिमडमहाराजांशी खेळीमेळीने वागत; त्यांना आदर दाखवीत नसत. ही गोष्ट चिमडमहाराजांच्या शिष्यांना पसंत पडत नसे. तेव्हा त्यांनी चिमडमहाराजांना एकदा फारच आग्रह केला, ''महाराज, बाबासाहेब मुजुमदार तुमचा योग्य तो मान राखतील असे काही तरी तुम्ही करा.'' प्रथम चिमडमहाराजांनी त्यांच्याकडे दुर्लक्षच केले. पण जेव्हा भक्तांचा फारच आग्रह आणि हट्ट झाला तेव्हा चिमडमहाराजांनी तसे करण्याचे कबूल केले. एकदा बाबासाहेब मठात आले असता चिमडमहाराजांनी नक्की काय केले हे ज्ञात नाही, पण असे घडले की बाबासाहेब चिमडमहाराजांना शरण आले. इतकेच नव्हे तर चिमडमहाराजांनी आपणास उपदेशानुग्रह द्यावा, अशी त्यांनी विनंति केली. त्यांच्या विनंतीला अनुसरून चिमडमहाराजांनी बाबासाहेबांना इ.स.१८८६ सालच्या गणेश चतुर्थी दिवशी अनुग्रह दिला. पुढे



बाबासाहेबांचे अनुकरण करून मुधोळ संस्थानचे अनेक सरकारी नोकर चिमडमहाराजांचे अनुगृहीत झाले. त्यांमध्ये हणमंत पांडुरंग कोटणीस हे एक होते. त्यांना गुरुवार, मार्गशीर्ष वद्य पंचमी, इ. स. १८८६ या दिवशी चिमडमहाराजांचा उपदेशानुग्रह मिळाला. त्यानंतर हणमंतरावजींचे चुलते वामनकाका कोटणीस यांना इ. स. १८८६ च्या पौष शुद्ध पंचमी (गुरुवार) या दिवशी चिमडमहाराजांनी उपदेश दिला. हे कोटणीस घराणे आणि चिमडमहाराजांचे यरगट्टीकर घराणे यांचा नातेसंबंध जुळून यावा, असे विधिलिखित होते आणि तसेच घडून आले.

वामनकाका कोटणीस यांना गोपाळ नावाचा एक मुलगा होता. तो चांगला चुणचुणीत आणि पारमार्थिक कल असणारा होता. त्याला मुधोळ संस्थानात नोकरी होती. हा मुलगा आपला जावई व्हावा असे चिमड महाराजांना वाटले. त्यांची देवका नावाची कन्या ही त्या काळच्या प्रथेप्रमाणे विवाहयोग्य झाली होती. तिला गोपाळ हा पति म्हणून योग्य होईल असे चिमडमहाराजांना वाटले. मग त्यांनी ही गोष्ट वामनराव कोटणीस यांच्याकडे काढली. चिमडमहाराजांची ही योजना वामनकाका कोटणीसांना पसंत पडली आणि मग देवका आणि गोपाळ यांचा विवाह होण्याचे ठरले. आणि हा विवाह चिमड मठातच करण्याचे निश्चित झाले. वधूचा भाऊ या नात्याने नववराचा कान पिळण्याचा मान साहजिकच दाजीसाहेबांना मिळणार होता.

विवाहासाठी मठासमोरच्या मोकळ्या जागेत तंबू ठोकण्यात आला होता. हा विवाह होण्यापूर्वी दोन विघ्ने येऊ लागली होती. पण ती चिमडमहाराजांच्या सामर्थ्याने दूर झाली. पहिले विघ्न होते एका घोड्याचे. चिमडमहाराजांचा एक घोडा होता. तो नेहमी मठाच्या दाराशी बांधलेला

असे. त्याला चांदणी लागली आणि त्याच्या तोंडातून लाळ गळू लागली. त्याने दाणापाणी घेणे वर्ज्य केले. आता हा घोडा गेला तर शुभकार्यात अशुभ होईल म्हणून त्या घोड्याला मठाबाहेर नेऊन बांधण्यात आले. त्यावेळी चिमडमहाराज बहिर्दिशेस जाण्यास निघाले होते. घोड्याजवळ उभे असणारे कुणब्याचे एक पोर म्हणाले, ''हे घोडे आता लौकरच मरेल.'' ते शब्द ऐकल्यावर चिमडमहाराज उद्‌गारले, ''हे घोडे कसे मरते ते पाहू!'' असे म्हणून त्यांनी घोड्याच्या पाठीवरून हात फिरविला आणि ते पुढे निघून गेले. ते परत येईपर्यंत घोडे उठून उभे राहिले होते आणि खाण्यास चंदी देताच ते खाऊ लागले होते. घोडे बरे झाले हे पाहिल्यावर त्याला परत मठाच्या दाराशी आणून बांधण्यात आले.

देवकाच्या विवाहात दुसरे विघ्न असे येऊ घातले होते. देवकाचा नेमस्त केलेला वर जो गोपाळ तो ह. पां. कोटणीस यांचा चुलत बंधु होता. ह. पां. कोटणीसांचे सर्व कुटुंब या लग्नासाठी चिमडला आले होते. हणमंतरावजींना कल्लव्वा नावाची एक चार पाच महिन्यांची मुलगी होती. विवाहापूर्वी तिची प्रकृती अचानक बिघडली आणि ती अत्यवस्थ झाली. सर्वजण चिंताग्रस्त झाले. हणमंतरावांच्या मातोश्रींनी, आपली नात अत्यवस्थ आहे, असे चिमडमहाराजांना सांगितले. आणि तिच्यावर कृपा करण्याची विनंती केली. क्षणमात्र चिमडमहाराजांनी विचार केला आणि ते हसून म्हणाले, ''अहो आजी, या मुलीला कोण अपाय करणार? ही मुलगी तर पुढे आमची सून होणार आहे!'' चिमडमहाराजांच्या वचनातील गर्भित अर्थाप्रमाणे कल्लव्वा त्या अत्यवस्थ अवस्थेतून बरी झाली. यावेळी चिमडमहाराजांचे दाजीसाहेब हे चिरंजीवच लग्नाला योग्य ठरणार होते. तेव्हा ही कल्लव्वा दाजीसाहेबांची पत्नी होणार हे चिमडमहाराजांना अभिप्रेत होते. पुढे त्याप्रमाणेच घडले. योग्य समय



येताच कल्लव्वा दाजीसाहेबांची पत्नी आणि चिमडमहाराजांची सून झाली.

अशाप्रकारे देवका आणि गोपाळ यांच्या विवाहात येऊ घातलेली विघ्ने निवारली गेली आणि हा विवाहसोहळा यशस्वीपणे, निर्विघ्नपणे, थाटामाटाने साजरा झाला.

काळाचा ओघ सतत पुढे पुढेच जात असतो. या कालाच्या अनुस्यूत प्रवाहात इ. स. १८९० हे साल आले. यावर्षी लक्ष्मीबाई अक्कांना इच्छा झाली की आपण परळी, आळंदी आणि देहू या ठिकाणी तीर्थयात्रेस जावे. त्यांनी आपली इच्छा चिमडमहाराजांच्या कानावर घातली. त्यांच्या इच्छेला मान देऊन, ही यात्रा पार पाडण्याचे चिमडमहाराजांनी ठरविले आणि त्याप्रमाणे ही यात्रा निघाली. प्रथम परळीला जाऊन सर्वांनी समर्थ रामदासस्वामींच्या समाधीचे दर्शन घेतले. नंतर सर्व मंडळी आळंदीला पोचली. तेथे ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेताना, चिमडमहाराज व अक्का यांना ''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी ओळंगल्या'' हा हरिपाठाच्या पहिल्या अभंगाचा पहिला चरण ऐकू आला. त्यानंतर पुष्पमंडपात पुष्पाचे सिंहासनावर बसलेल्या ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन चिमडमहाराजांना झाले. या समयी चिमडमहाराजांना उद्देशून ज्ञानेश्वरमहाराज म्हणाले, ''रामभाऊ, चला चला, लौकर आटपा. तुमची निजधामास येण्याची वेळ झाली आहे.'' ज्ञानेश्वरमहाराजांनी चिमडमहाराजांना असे सांगितले याचे कारण असे :- ज्ञानेश्वरमहाराजांचा अवतार म्हणजे एकनाथमहाराज आणि एकनाथमहाराजांचा अवतार म्हणजे चिमडमहाराज, असे निंबरगीकरमहाराज सांगत असत. ज्ञानेश्वरमहाराजांचे वचन ऐकल्यावर चिमडमहाराज त्यांना म्हणाले, ''महाराज, आपल्या सूचनेप्रमाणे मी लौकरच निजधामी येतो.'' ही घटना चिमडमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्का

व सौ. माईसाहेब यांना सांगितली. नंतर इ. स. १८९१ मध्ये निर्वाण करावयाचे असे चिमडमहाराजांनी मनाशी ठरविले आणि तत्पूर्वी निरवानिरव करण्यास वेळ हवा म्हणून चिमडमहाराजांनी देहूस जाण्याचा बेत रद्द केला आणि सर्वजण चिमडास परतले.

चिमडला परत आल्यावर चिमडमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्का आणि सौ. माईसाहेब यांना सांगितले, ''अहो, ज्ञानेश्वरमहाराजांनी मला निजधामास येण्यास सांगितले आहे, हे मी तुम्हाला सांगितले आहेच. त्यांच्या सूचनेप्रमाणे मी आता पुढील वर्षी म्हणजे इ. स. १८९१ मध्ये इहलोक सोडणार आहे.'' त्या दोघींना खूप वाईट वाटले. पण ठरलेल्या गोष्टीपुढे इलाज नसतो. हे जाणून त्यांनी येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची तयारी केली. मग चिमडमहाराजांनी निरवानिरवीस सुरुवात केली.

इ.स. १८९० मध्ये दाजीसाहेबांना दहावे वर्ष लागले होते. त्या काळी लहानपणीच मुलामुलींची लग्ने होत. तेव्हा आता दाजीसाहेबांचा विवाह उरकून घ्यावा, असे चिमड महाराजांनी ठरविले. ह. पां. कोटणीस यांची मुलगी कल्लव्वा ही आपली सून होणार, असे त्यांनी मागे सांगितले होते. त्याप्रमाणे त्यांनी ह. पा. कोटणीस यांचे मत विचारले. ह.पां.कोटणीसांनी या गोष्टीला संमती दिली. लगोलग वैशाख शुद्ध ८, इ. स. १८९१ या दिवशी दाजीसाहेब आणि कल्लव्वा यांचा शुभविवाह चिमड मठात थाटामाटाने साजरा झाला.

हा विवाह होण्यापूर्वी चिमडमहाराजांनी आपल्या नारायण या मुलाचे उपनयन उरकून घेतले. त्याला इ. स. १८९१ मध्ये सहावे वर्ष लागले होते.

नारायणाची थोरली बहीण बहिणा नावाची होती. तिला तात्यासाहेब वसगडेकर यांच्या घरी विवाह करून द्यावे, असे चिमडमहाराजांनी लक्ष्मीबाई अक्का व सौ. माईसाहेब यांना सांगून ठेवले.



वरीलप्रमाणे चिमडमहाराजांनी कौटुंबिक निरवानिरव केली. त्यांच्यापुढे मुख्य प्रश्न होता तो आपल्या संसाराचा आणि मठाच्या पारमार्थिक कारभाराचा. मठ हा चिमडमहाराजांच्या खाजगी मालकीचा होता. मठाची बरीच इस्टेट होती. तेव्हा मठाचा लौकिक कारभार एकाद्या परक्या माणसाकडे सोपविणे धोक्याचे होते. आणि मुले लहान असल्याने त्यांना ते जमण्यासारखे नव्हते. तसेच मठाचा पारमार्थिक व्यवहारही लहान मुलांच्याकडे सोपविणे शक्य नव्हते. तेव्हा मठाचे हे दोन्ही कारभार जाणत्या अशा लक्ष्मीबाई अक्कांकडे सोपवावे, असे त्यांना वाटले. म्हणून ते एकदा सौ. माईसाहेबांना म्हणाले, ''अहो, आम्ही आता देह ठेवणार आहोत. आपली मुले अद्यापि लहान आहेत. तेव्हा आपला ज्येष्ठ पुत्र दाजीबा वयात येईपर्यंत, आपल्या लक्ष्मीबाई अक्कांकडे मठाची देखभाल सोपवावी असे माझ्या मनात आहे. त्या वयाने ज्येष्ठ आहेत आणि परमार्थातील अधिकारी आहेत. ज्येष्ठ व्यक्ति या नात्याने प्रपंच व परमार्थ या दोहोंकडेही त्यांचे लक्ष राहील. मला वाटते ही व्यवस्था तुम्हाला मान्य होईल.'' त्यावर सौ. माईसाहेबांनी उत्तर दिले, ''अहो, आपले वचन हे मी नेहमीच प्रमाण मानले आहे. तुम्ही सर्व विचार केला आहे. तेव्हा तुम्ही ठरविलेल्या व्यवस्थेत मला काही गैर दिसत नाही. तुमचा बेत मला मान्य आहे.'' सौ. माईसाहेबांचे हे उत्तर ऐकताच चिमडमहाराजांना सौ. माईसाहेब यांच्या समजूतदारपणाचे फारच कौतुक वाटले व ते त्यांनी शब्दांत व्यक्तही केले.

अशाप्रकारे सौ. माईसाहेब यांची संमति आहे हे कळल्यावर, चिमडमहाराज लक्ष्मीबाई अक्कांना म्हणाले, ''अक्का, मी आता निर्वाण करणार आहे हे तुम्हाला माहीत आहे. माझी तुम्हाला विनंति आहे की

दाजीबा वयात येईपर्यंत तुम्ही या आपल्या मठाचा लौकिक आणि पारमार्थिक कारभार पहावा आणि तुम्ही घरच्याच असल्याने तुम्हाला त्यात जड वाटण्यासारखे काही नाही. तेव्हा तुम्ही मला वचन द्या की या मठाचा प्रतिनिधि म्हणून तुम्ही सर्व कारभार पहाल. इतर कुणाकडे हा कारभार सोपविणे मला इष्ट वाटत नाही.'' लक्ष्मीबाई अक्कांनी चिमडमहाराजांच्या म्हणण्याचा नीट विचार केला. त्यांना चिमडमहाराजांची भूमिका पटली आणि चिमडमहाराज निश्चिंत व्हावेत म्हणून त्यांनी वचन दिले, ''भाऊ, दाजीबा वयात येईपर्यंत मी सर्व कारभार पाहीन.'' मग मात्र चिमडमहाराज निर्धास्त झाले आणि नंतर त्यांनी आपल्या अनुगृहीत भक्तांना सांगितले की, दाजीबा वयात येईपर्यंत लक्ष्मीबाई अक्का या मठाचा सर्व व्यवहार पाहतील; भक्तांनीही ते मान्य केले.

अशाप्रकारे सर्व व्यवस्था केल्यावर चिमडमहाराजांनी शुक्रवार, मार्गशीर्ष, शुद्ध ११, शके १८१३ (इ.स. १८९१) हा आपल्या निर्वाणाचा दिवस ठरविला.

चिमडमहाराज निर्वाणास जाण्यापूर्वी एक दिवस अगोदर, लक्ष्मीबाई अक्कांनी दाजीसाहेबांना आपल्या वडिलांना नमस्कार करण्यास सांगितले. चिमडमहाराजांनी दाजीसाहेबांचे मस्तकावरून आपला वरदहस्त फिरविला आणि ते उद्‌गारले, ''याचे सर्वच आता बरे आहे.''

चिमडमहाराजांनी देह ठेवताच सर्वत्र दुःखाचे व शोकाचे सावट पसरले. त्यातून कशीबशी वाट काढून लक्ष्मीबाई अक्का मठाचा सर्व कारभार पाहू लागल्या.

****

# प्रकरण ४

ज्ञानेश्वरमहाराजांना कबूल केल्याप्रमाणे, निर्वाण करण्याचे ठरवून चिमडमहाराजांनी सर्व निरवानिरव केली. आपल्या निर्वाणाचा ठरलेला दिवस त्यांनी लक्ष्मीबाई अक्का, सौ. माईसाहेब आणि इतर काही भक्त यांना सांगून ठेवला. नंतर महानिर्वाण करण्याचे ठरविल्याने त्यांनी काही आजाराचा बहाणा केला. वैद्याने येऊन प्रकृति तपासली तर काही दुखणे दिसत नसे. परंतु वैद्य परत गेले की चिमडमहाराज आजाराचे काहीतरी लक्षण दाखवीत. असेच दिवस जात असताना त्यांनी आपले निर्वाण केले.

चिमडमहाराजांच्या महानिर्वाणानंतर, त्यांनी दिलेल्या वचनानुसार, लक्ष्मीबाई अक्का या मठाधिपतीची प्रतिनिधि या स्वरूपात कारभार पाहू लागल्या. एकदा चिमडमहाराजांचे चिरंजीव नारायण आजारी पडले. त्यांच्या मोठ्या दुखण्यातून अक्कांनी त्यांना वाचविले. चिमड मठावर दरोडा घालण्यास येणाऱ्या दरोडेखोरांना त्यांनी परतवून लावले. हणमंतराव कोटणीस यांना त्यांच्या नागोदराच्या दुखण्यातून बरे केले. पारमार्थिक दृष्ट्या, त्या मठात येणाऱ्या मुमुक्षुजनांना उपदेशानुग्रह देत. माईसाहेबही अनुग्रह देत असत.

दाजीसाहेब व नारायणराव या चिमडमहाराजांच्या मुलांच्या लौकिक शिक्षणासाठी लक्ष्मीबाई अक्कांनी काही काळ त्यांना बेळगावास ह.पां.कोटणीस यांच्याकडे ठेवले होते. त्यांची पारमार्थिक प्रगति व्हावी या दृष्टीने त्यांनी नारायणरावाना बळवंतराव यरगट्टीकर यांचेकडून अनुग्रह

देवविला. बळवंतराव हे चिमडमहाराजांचे पुतणे होते. निंबरगीकरमहाराजांचे चिरंजीव भीमाण्णामहाराज होते. त्यांच्याकडून त्यांनी दाजीसाहेबांना अनुग्रह देवविला. अनुग्रहानंतर भीमाण्णामहाराज दाजीसाहेबांना म्हणाले, ''दाजीबा, माझे वडिल साधकांना जो उपदेश करीत त्यातील काही भाग मी तुम्हास सांगतो. त्याप्रमाणे तुम्ही वर्तन करणे हे तुमच्या हिताचे होईल. माझे पिताजी निंबरगीकरमहाराज सांगत :-

''आपल्याला देवाने जे दिले आहे ते कमी लेखून इतरांचे द्रव्य, स्त्री, भूमि इत्यादींची हाव धरू नये. आहे त्यात संतोष मानून रहावे.

''इंद्रिये ही आपापल्या विषयांकडे धावत असतात. त्यांच्या मागोमाग मनही धावते. मग आसक्ति निर्माण होते. म्हणून इंद्रियांचा संयम आणि मनाचा संयम करणे आवश्यक आहे.

''काम, क्रोध, लोभ, इत्यादि सहा विकार माणसाला दुराचाराला प्रवृत्त करतात. त्या विकारांना वश होऊ नये.

''प्रत्येकाजवळ अहंकार असतो. अहंकार हा प्रपंच व परमार्थ यांत घातक आहे. ज्या विषयाबद्दल अहंकार येतो त्याचा नाश होतो. म्हणून माणसाने अहंकार मिरवू नये.

''आळस हा प्रपंच आणि परमार्थ या दोहोंतही बिघाड करतो. माणसाने आळसाला अजिबात थारा देऊ नये.

''माणसाने प्रयत्नशील असावे. प्रयत्न हा प्रामाणिकपणे करावा.

''नेहमी खरे बोलावे. खोटे कधी बोलू नये.

''चिंता करणे हे वाईट आहे. चिंतेने माणसाचे मन खचते. सर्व काही ईश्वरेच्छेने घडते असे समजून चिंता करणे सोडून द्यावे.

''नेहमी परोपकार करावा. पण आपले नुकसान करून घेऊन मात्र परोपकार करू नये. परपीडा हे पाप आहे.



''सदाचाराने वागावे. इतरांशी कपटाने वागू नये. इतरांना फसवू नये, इतरांचे अंत:करण दुखवू नये.

''वाईट माणसांची संगत धरू नये. नेहमी चांगल्यांच्या संगतीत रहावे.

''नरदेह हा दुर्लभ आहे. त्याचा यथोचित उपयोग करून, परमार्थ करून, जन्ममरणातून सुटावे.

''संसार हा पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे आहे. संसारात सुख शोधणे हे मृगजळाने साळीकेळी पिकविण्यासारखे आहे.

''प्रपंचाकडे उदास दृष्टीने पहावे आणि परमार्थाकडे उल्हास दृष्टीने पहावे.

''गुरूंनी सांगितलेले साधन उत्साहपूर्वक करावे. दिवसातून तीन वेळा एकेक तास साधन करावे.''

हा उपदेश दाजीसाहेबांनी लक्षात ठेवला आणि त्याप्रमाणे ते वागू लागले.

दाजीसाहेब व नारायणराव हे साधन करतात यावर लक्ष्मीबाई अक्कांचे पूर्ण लक्ष असे.

मठातील नित्याचे आणि नैमित्तिक प्रसंगांचे कार्यक्रम व्यवस्थित व्हावेत इकडेही अक्का लक्ष पुरवीत असत. त्या कार्यक्रमांची माहिती त्यांनी हळूहळू दाजीसाहेबांना करून दिली. काही कार्यक्रमांत भाग घेण्यासही त्यांनी दाजीसाहेबांना सांगितले.

एकदा लक्ष्मीबाई अक्कांनी दाजीसाहेबांना यथायोग्य उपदेश पुढीलप्रमाणे केला :-

''दाजीबा, तुम्ही वयात आल्यावर मठपति होणार आहात. तेव्हा त्या दृष्टीने मी तुम्हाला सांगते ते नीट लक्षात घ्या.

''तुम्ही विवाहित आहात. तेव्हा प्रपंच चालवतच तुम्हाला परमार्थ साधावयाचा आहे. सध्या ज्याप्रमाणे तुमच्या मातोश्री माईसाहेब प्रापंचिक बाजू सभाळीत आहेत, तसेच तुम्ही चालू ठेवा.

''आपल्याकडे लोक येत असतात. कोण कशासाठी येतो हे वरवर पाहिल्यास कळत नाही. तेव्हा प्रत्येकाशी सांभाळून वागवयास हवे.

''आपला मठ हा मुख्यत: परमार्थासाठी आहे. तेव्हा मठातील पारमार्थिक कार्यक्रम हे न चुकता वेळच्या वेळी होत आहेत हे पाहणे गरजेचे आहे.

''मठाचा जो जमीनजुमला व शेतेमळे आहेत, ते पहाणारे लोक व्यवस्थित कामे करीत आहेत ना, यावर देखरेख ठेवणे हे आवश्यक आहे.

''मठातील पारमार्थिक कार्यक्रम हे परंपरेनुसार होत आहेत, त्यांत काही कमी पडत नाही, इकडेही लक्ष असावयास हवे.

''नवीन कार्यक्रम सुरु करायचे असतील तर ते यथासांग पार पडतील ही खात्री असेल तरच ते सुरू करावेत.

''अनुगृहीत लोक, भक्त लोक शंका विचारण्यास येतात. त्यांच्या शंकांचे समाधानकारक निवारण करणे हे महत्त्वाचे आहे.

''परमार्थ करत येणाऱ्या माणसाकडे जास्त लक्ष द्यावे. म्हणजे परमार्थात त्याची प्रगति होत राहील.

''येणाऱ्या प्रत्येकाशी गोड बोलावे. कठोर बोलून कुणाचे मन दुखवू नये. कारण बोलण्याने होणारी मनाची जखम बरी होत नाही.

''कोणी चूक करीत असेल तर ती त्याला गोड शब्दांत समजावून



सांगून ती सुधारण्याची संधि त्याला द्यावी.

''कुणालाही पोकळ आश्वासन देऊ नये. दिलेले आश्वासन पाळणे हे आपले कर्तव्य आहे.

''विश्वासू माणसे आपल्याजवळ गोळा करावीत. आवश्यक वाटल्यास त्यांचा सल्ला घ्यावा.

''अशाप्रकारे वागत गेल्यास तुम्ही योग्य मठपति व्हाल.''

असा उपदेश लक्ष्मीबाई अक्कांनी दाजीबांना केला.

निंबरगीकरमहाराजांच्या निर्वाणानंतर लक्ष्मीबाई अक्का निंबरगीस गेल्या नव्हत्या. इ.स. १८९२ मध्ये चिमडास येऊन त्यांना सात वर्षे झाली होती. तेव्हा एकदा निंबरगीस जावे असे त्यांना वाटू लागले होते. आता दाजीसाहेब आणि कल्लव्वा यांचा विवाह झाल्यावर, त्या दोघांनाही निंबरगीस निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शनास न्यावे, असा विचार त्यांच्या मनात आला. हा विचार त्यांनी ह. पां. कोटणीस यांना कळविला. त्यांनाही तो विचार पसंत पडला. मग ते बेळगावहून चिमडला आले. इ. स. १८९३ च्या मार्गशीर्ष महिन्यातील चिमडमहाराजांची आराधना झाल्यावर, हणमंतराव कोटणीस, कल्लव्वा, दाजीसाहेब आणि अन्य काही मंडळी यांच्यासह लक्ष्मीबाई अक्का निंबरगीच्या यात्रेस गेले.

निंबरगीत गेल्यावर कल्लव्वा आणि दाजीसाहेब या बालदांपत्याने जोडीने निंबरगीकरमहाराजांच्या समाधीची पूजा केली. यावेळी पुढील घटना घडल्या :– निंबरगीकरमहाराजांच्या रहात्या घरी अक्कांनी आपल्या हातांनी निंबरगीकरमहाराजांचा चांदीचा मुखवटा बसविला. याचवेळी चिमडमहाराजांचे शिष्य शिवरामबुवा ब्रह्मचारी हे निंबरगीस आले होते. त्यांनी एक सुंदर देव्हारा आणला होता. तो त्यांनी निंबरगीकरमहाराजांच्या

राहत्या घरी दिला. त्या देव्हाऱ्यात निंबरगीकरमहाराजांची उत्सवमूर्ति ठेवून, तीन दिवस कथा कीर्तन, पुराण वाचन, भजन इत्यादि कार्यक्रम करण्यात आले.

याच समयी लक्ष्मीबाई अक्कांचा मुक्काम निंबरगीत असताना, एके दिवशी हणमंतराव कोटणीस निंबरगीकरमहाराजांच्या समाधीच्या पूजेसाठी निघाले होते. त्यांना प्रसादासाठी केळी हवी होती. गावात कुठे केळी मिळाली नाहीत. तितक्यात एक पुरुष डोक्यावर केळ्याची पाटी घेऊन जाताना दिसला. तेव्हा त्याला हाक मारून त्याचेकडून पाटीभर केळी विकत घेण्यात आली. त्या माणसाला पैसे आणून देईपर्यंत तो पुरुष अदृश्य झाला होता. त्याचा शोध घेण्यात आला पण त्याच सुगावा लागला नाही. ही घटना लक्ष्मीबाई अक्कांना कळली. तेव्हा त्या उद्‌गारल्या, ''बाबांनो, तो केळीवाला पुरुष म्हणजे निंबरगीकरमहाराजच होते. त्यांचा सुगावा तुम्हा कसा लागणार?''

दाजीसाहेब व लक्ष्मीबाई अक्का यांची ही निंबरगीची यात्रा यथासांग पार पडली. यात्रा परतण्याच्या दिवसाच्या आदल्या दिवशी सर्वजण निरोप घेण्यास निंबरगीकरमहाराजांच्या समाधीच्या दर्शनास गेले. समाधीच्या शिळेवर गंधाने निंबरगीकरमहाराजांचा चेहरा कोरण्यात आला होता. त्या चेहऱ्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहू लागले होते. मोठ्या कष्टाने महाराजांचा निरोप घेऊन दाजीसाहेब, अक्का इत्यादींसह चिमडास परत आले.

आत्तापर्यंत साधुमहाराज, निंबरगीकरमहाराज आणि चिमडमहाराज यांची निर्वाणे अक्कांनी पाहिली होती. पण पारमार्थिक बळावर त्या सर्व काही करीत होत्या. चिमडमहाराजांना दिलेल्या वचनाप्रमाणे त्या सध्या चिमडमठाचा कारभार पहात होत्या. आता आपणही निर्वाण करावे असे त्यांच्या मनात येऊ लागले होते. निर्वाणापूर्वी दाजीसाहेब हे मठाधिपति



होणार हेही त्याना सांगावयाचे होते.

इ. स. १८९५ साली दाजीसाहेबांना पंधरावे वर्ष लागत होते. तेव्हा या वर्षीच आपण निर्वाण करावे असे लक्ष्मीबाई अक्कांच्या मनाने घेतले. आणि तसे त्यांनी बोलून दाखविले. पण दाजीसाहेब, ह.पां.कोटणीस आणि अन्य काही निष्ठावंत भक्त यांच्या अत्याग्रहाने अक्कांनी आपले निर्वाण लांबविले आणि त्यांना सांगितले, ''बाबांनो, तुमचा आग्रह मोडवत नाही. ठीक आहे. आणि दोनच वर्षे मी इहलोकी राहीन. नंतर मात्र मी कुणाच्याही आग्रहाला बळी न पडता देहत्याग करीन.'' अशाप्रकारे इ. स. १८९७ साली निर्वाण करण्याचे निश्चित केल्यावर, त्यांनी दाजीसाहेबांना मठपति या दृष्टीने प्रशिक्षण देण्याचे ठरविले.

लक्ष्मीबाई अक्कांनी प्रथम मठात होणारे नित्य व नैमित्तिक कार्यक्रम कोणते हे क्रमाने दाजीसाहेबांना समजावून सांगितले आणि त्यांत मठपतीचे कार्य कोणते हेही सांगितले. लौकिक दृष्ट्या मठाची इस्टेट किती आहे याची कल्पना त्यांनी दाजीसाहेबांना दिली व त्यावर कधी देखरेख ठेवावयाची आणि सर्व हिशेब कसे ठेवायचे हेही अक्कांनी दाजीसाहेबांना समजावून सांगितले. त्यानंतर त्यांनी पूजा, आरती, इत्यादींमध्ये दाजीसाहेबांना सहभाग घेण्यास सांगितले. आणि दाजीसाहेबांचे अंगी परमार्थ मुरावा म्हणून अक्का दाजीसाहेबांकडून त्रिकाल साधन करवून घेऊ लागल्या आणि आत्मानुभवाकडे त्यांची प्रगति होत आहे इकडेही त्यांनी लक्ष दिले.

अशाप्रकारे दाजीसाहेबांना प्रशिक्षण देण्यात दोन वर्षे उलटून गेली. आणि इ. स. १८९७ साल उजाडले. यावेळी दाजीसाहेब वयात आले होते. त्यांना मठाच्या सर्व कारभाराची माहिती झाली होती. तेव्हा दाजीसाहेबांचेकडे सर्व काही सोपवून आपण आता निजधामी जावे असे

अक्कांनी ठरविले. इ. स १८९७ या वर्षाचा आश्विन महिना त्यांनी निर्याणासाठी निश्चित केला आणि त्यांनी निरवानिरव करण्यास सुरुवात केली. त्यांनी दाजीसाहेबांना जवळ बोलावून सांगितले, ''दाजीसाहेब, माझ्यानंतर तुम्ही मठाधिपति होणार आहात. ती जबाबदारी सांभाळण्यास तुम्ही समर्थ झाला आहात अशी माझी खात्री झाली आहे. तथापि मी एक सांगते ते लक्षात ठेवा :- नेहमी संभाळून विचारपूर्वक वागावे म्हणजे अनुताप करण्याची पाळी येत नाही.'' दाजीसाहेबांनी लक्ष्मीबाई अक्कांचे हे वचन लक्षात ठेवले.

त्यानंतर लक्ष्मीबाई अक्कांनी मठात येणाऱ्या सर्व भक्तमंडळींना बजावून सांगितले, ''बाबांनो, मी आता जाणार आहे. माझ्यानंतर दाजीसाहेब हेच या मठाचे अधिपति होणार आहेत. तेच आपल्या चिमड संप्रदायाचे नेतृत्व करणार आहेत. ते वयाने लहान आहेत हा विचार तुम्ही करू नका. तुम्ही सर्वजण त्यांचा योग्य तो मान राखा आणि त्यांच्या आज्ञेत राहा.''

इ. स. १८९७ या वर्षाचा आश्विन महिना येण्यापूर्वीपासून लक्ष्मीबाई अक्कांची तब्येत बिघडलेली दिसू लागली. पण त्यांच्या प्रकृतीचे मानच कुणास लागेनासे झाले. घटकेत त्या मोठ्या उत्साहाने सर्व व्यवहार करण्यात रमून जात, तर दुसऱ्या घटकेला त्यांची प्राणांतिक अवस्था होई आणि त्या निजून रहात. या काळात दाजीसाहेब त्यांची योग्य ती काळजी घेत होते.

लक्ष्मीबाई अक्कांची अशी नाजूक परिस्थिति असतानाच, त्यांनी सर्वांना सांगितले, ''मी येत्या आश्विन शुद्ध प्रतिपदेला देह ठेवणार आहे. आणि माझ्यानंतर दाजीसाहेबच मठाचा सर्व प्रपंच व परमार्थ पहाणार आहेत.''



यथाक्रम आश्विन शुद्ध प्रतिपदा उघाडली. पण या दिवशी चिमडमहाराजांच्या पत्नी माईसाहेब अस्पर्श झाल्यामुळे लक्ष्मीबाई अक्कांनी त्या दिवशीचे आपले निर्याण स्थगित केले. आणि मग त्यांनी आश्विन शुद्ध तृतीयेला निर्याण करण्याचे निश्चित केले. आणि सर्वांना सांगून सवरून, गावाला जावे त्याप्रमाणे, बुधवार, आश्विन शुद्ध, ३ शके १८१९ (इ. स. १८९७) या दिवशी ईश्वरस्मरण करीत लक्ष्मीबाई अक्का स्वरूपाकार झाल्या. दाजीसाहेब व अन्य लोक यांना फार शोक झाला. परंतु पुढील गोष्टी करणे क्रमप्राप्तच होते. साधुमहाराजांच्या वटवृक्षाजवळ त्यांच्या अचेतन देहावर अग्निसंस्कार करण्यात आला आणि त्यांच्या दहनस्थानावर एक औदुंबर वृक्ष लावण्यात आला. काही दिवसांनी चिमड मठाच्या आवारात त्याची समाधि बांधली गेली.

लक्ष्मीबाई अक्कांच्या निर्याणाने दाजीसाहेब शोकग्रस्त झाले होते. मातोश्री माईसाहेबांच्या जोडीने असणारा अक्कांचा आधार आता संपला होता. पण कर्तव्य करणे भागच होते. तेव्हा शोक बाजूला सारून दाजीसाहेबांनी मठाच्या सर्व कारभाराची जबाबदारी भारदस्तपणे पहाण्यास प्रारंभ केला. लक्ष्मीबाई अक्कांचे वचन लक्षात ठेवून सर्व कार्य संयमाने आणि विचारपूर्वक करीत राहिले. साहजिकच ते लौकरच सांप्रदायिक माणसांत प्रिय झाले.

दाजीसाहेबांच्या जातकानुसार ते अल्पायुषी होते. लक्ष्मीबाई अक्कांचेनंतर साधारण तीन वर्षे त्यांनी मठाचा कारभार चोखपणे सांभाळला. आता त्यांचेही निर्याण जवळ आले होते. कालानुक्रमाने इ. स. १९०० हे वर्ष आले आणि याच वर्षी दाजीसाहेब निर्याणास गेले.

इ. स. १९०० सालच्या ऑगस्ट महिन्यात दाजीसाहेबांची प्रकृति बिघडली. त्यांना बारीक ताप येऊ लागला. तथापि त्या तापाकडे दुर्लक्ष

करून, त्यांनी आपल्या दैनिक कार्यक्रमांत खंड पडू दिला नाही. सकाळचे स्नान व आन्हिक, नंतर देवपूजा, मग संध्याकाळचे पोथीवाचन इत्यादि रोजचे कार्यक्रम त्यांनी चालूच ठेवले. परिणामत: त्यांचा ताप वाढत गेला. प्रारंभी काही दिवस दाजीसाहेबांच्या मातोश्री माईसाहेब इत्यादींनी त्यांचेवर घरगुती उपचार केले परंतु त्यांचा इष्ट परिणाम दिसून आला नाही. ऑगस्ट महिन्याच्या वीस तारखेच्या सुमारास त्यांच्या खाकऱ्यातून रक्त पडू लागले. त्यांची प्रकृति अधिकच बिघडली आणि गंभीर झाली.

दाजीसाहेबांचे श्वशुर ह. पां. कोटणीस हे त्यावेळी सांगलीत रहात होते. त्यांना दाजीसाहेबांच्या खालावत चाललेल्या प्रकृतीबद्दल कळविण्यात आले. त्यांचे दुखणे गंभीर आहे हे लक्षात येताच कोटणीसांनी प्रत्यक्षदर्शी माहिती मिळविण्यासाठी प्रथम आपले बंधु पुंडलीकराव आणि कारकून नानबा फडणीस यांना लगेच चिमडास पाठविले. चिमडात जाऊन दाजीसाहेबांना पाहिल्यावर त्याच्या लक्षात आले की दाजीसाहेबांची प्रकृति फारच बिघडलेली आणि खालावलेली आहे. ती गोष्ट त्या दोघांनी सांगलीत येऊन कोटणीसांना सांगितली. आपल्या जावयाची स्थिति गंभीर आहे हे लक्षात येताच कोटणीस अत्यंत चिंतातुर झाले. सांगलीतील सांभारे हे नामांकित वैद्य हे कोटणीसांचे स्नेही होते. त्यांना कोटणीसांनी दाजीसाहेबांच्या प्रकृतीबद्दल सांगितले आणि सांभारे वैद्यांना बरोबर घेऊनच कोटणीस चिमडास पोचले.

कोटणीस आणि सांभारे वैद्य मठात पोचले. सांभारे वैद्यांनी दाजीसाहेबांची प्रकृति तपासली. त्यांना दाजीसाहेबांच्या प्रकृतीचे चिन्ह काही ठीक दिसले नाही. पण ती गोष्ट इतरांना न सांगता, '''मी आता औषध पाठवून देतो,'' असे म्हणून सांभारे वैद्य तेरदळ गावी निघून गेले.



त्याच रात्री दाजीसाहेबांची प्रकृति विकोपास गेली आणि पहाटेच्या सुमारास त्यांना ऊर्ध्व लागला. आणि २८ ऑगस्ट १९०० या दिवशी, सकाळी नऊचे सुमारास, दाजीसाहेब देहत्याग करून निजधामास गेले. आणि त्याचवेळी पुढील घटना घडली :- साधुमहाराज आणि चिमडमहाराज यांच्या नावाचे दोन वृक्ष चिमड मठाच्या परिसरात होते. त्या वृक्षांना जणू दाजीसाहेबांच्या निर्याणाचे दु:ख झाले आणि त्यांच्यावरील सर्व पाने एकदम अचानकपणे गळून पडली. या घटनेने दाजीसाहेबांचे श्रेष्ठत्व लोकांच्या पुन: नजरेत भरले.

अशाप्रकारे एका प्रसिद्धिपराङ्मुख परंतु तेजस्वी अशा जीवनाचा अंत झाला. मठातील सर्वजण आणि भक्तजन दु:खी झाले. माईसाहेबांना तर अतीव शोक झाला. पण त्या परमार्थात मुरल्या असल्याने त्यांनी आपला शोक आवरून घेतला.

दाजीसाहेबांना पुत्रसंतान नव्हते. त्यामुळे त्यांच्यानंतर मठाचा अधिपति कोण हा प्रश्न निर्माण झाला. तो माईसाहेबांनी असा सोडविला :- दाजीसाहेबांचे धाकटे बंधु नारायणराव हे परमार्थातील अधिकारी पुरुष होते. त्यांना मठपति म्हणून माईसाहेबांनी घोषित केले. आणि माईसाहेबांनी नारायणरावांना मठाधिपति म्हणून कार्यभार पार पाडण्याची आज्ञा केली. मातोश्रींच्या आज्ञेनुसार नारायणराव चिमड मठाचा कारभार पाहू लागले.

नारायणराव मठाधिपति झाल्यावर त्यांनी चिमडमहाराज, लक्ष्मीबाई अक्का आणि दाजीसाहेब यांच्या समाधि बांधवून घेतल्या आणि त्यांची पूजा-अर्चा सुरू केली.

*****


## संदर्भ सूची

१) कैवल्य पुरुष, खंड १, ह.पां. कोटणीस, सांगली,१९३३
२) चिमडमहाराज, प्रा.डॉ.के.वा.आपटे, सांगली,२०११
३) नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र, प्रा.डॉ.के.वा.आपटे, सांगली, २०१०
४) प.पू. मातोश्री माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र, प्रा.डॉ.के.वा.आपटे, सांगली, २०११
५) रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र, प्रा.डॉ.के.वा.आपटे, सांगली, २००९
६) हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र, साधुदास, सांगली, १९३७

***



प.पू.सद्गुरु श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे हस्ताक्षर.



**पहा दाजिबा सूत रामप्रभूचे ।**
**कृपाछत्र त्यांचेवरी सद्गुरूचे ।**
**मनी आठवी श्रीगुरुराज याला ।**
**नमस्कार साष्टांग माझा तयाला ।।**

–श्रीदासराममहाराज केळकर

**रघुनाथप्रियं स्वामिं शिष्यं नारायणात्मकम् ।**
**तं श्रीसाधुमहाराजं वन्देऽहं गुरुरूपिणम् ।।**

–श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर

**जया रामराया पिता लाभला हो ।**
**जया माय माई मिळाली सखे हो ।**
**जयाचा गुरू तो असे भीमराजा ।**
**नमस्कार त्या दाजिबालागी माझा ।।**

– के. वा. आपटे

****



## प्रा. डॉ. के. वा. आपटे

अल्प परिचय

१) संपूर्ण नाव :– केशव वामन आपटे
२) जन्मस्थळ :– सांगली.
३) जन्मतारीख :– ९ सप्टेंबर १९२९
४) शिक्षण :– मराठी शाळा नं.२, पी.एम.हायस्कूल(सध्याचे जी.ए.हायस्कूल), विलिंग्डन कॉलेज, सांगली.
५) अनुग्रह :– १९४२ साली श्रीदासराममहाराजांचा अनुग्रह
६) परीक्षा, पारितोषिके इत्यादि :–
अ) पी. एम. हायस्कूल मध्ये : करंदीकर शिष्यवृत्ति
आ) मॅट्रिक (मुंबई विद्यापीठ),डिस्टिंक्शन,अकबरनवीस संस्कृत शिष्यवृत्ति
इ) विलिंग्डन कॉलेज मध्ये : अभ्यंकर शिष्यवृत्ति, मुजुमदार शिष्यवृत्ति, बंडो गोविंद शिष्यवृत्ति, पी. डी. गुप्ते पारितोषिक
ई) इंटर आर्टस् (पुणे विद्यापीठ), लोकमान्य टिळक संस्कृत शिष्यवृत्ति.
उ) बी.ए. (संस्कृत ऑनर्स), प्रथम वर्ग (पुणे विद्यापीठ)
ऊ) एम.ए. (पुणे विद्यापीठ), प्रथम वर्ग, बी. डी. नातू वेदांत पारितोषिक.
ए) पी.एच.डी. (मुंबई विद्यापीठ)
७) अध्यापन :–
अ) कीर्ति कॉलेज (मुंबई) व विलिंग्डन कॉलेज (सांगली) यामध्ये पदवीपूर्व ते पदवी वर्गापर्यंत संस्कृत व अर्धमागधी यांचे अध्यापन.
आ) मुंबई विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांचे तर्फे पदव्युत्तर वर्गांना संस्कृत व अर्धमागधी यांचे अध्यापन
इ) एम्.फिल्. व पी.एच.डी. साठी मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठाची मान्यता.
८) निबंधासाठी पारितोषिके :–
अ) भारतीय तत्त्वज्ञानातील आत्मसाक्षात्काराचे मार्ग या निबंधासाठी बनारस हिंदु विद्यापीठाचे बूच मेटॅफिजिक्स प्राईज्
आ)'मूळ गीता व तिचा वक्ता ' या निबंधासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे पारितोषिक.

९) प्रकल्प :-

मध्यवर्ती भारत सरकारकडून शिक्षण विभागातर्फे ‘शास्त्रचूडामणि’ योजनेखाली प्रकल्पासाठी स्कॉलर म्हणून १९९०-९२ सालासाठी निवड. प्रकल्पासाठी शंकराचार्यकृत ‘आत्मानात्मविवेक’ हा ग्रंथ.

१०) पदे :-

अ) आजीव सदस्य, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे

आ) विलिंग्डन कॉलेजात संस्कृत विभागप्रमुख, वसतिगृह प्रमुख, उपप्रचार्य.

इ) मुंबई व शिवाजी विद्यापीठात संस्कृत अध्ययन मंडळाचा सदस्य.

११) देणग्या :-

अ) शैक्षणिक, समाजोपयोगी, व धार्मिक संस्थांना आर्थिक देणग्या.

आ) कीर्ति कॉलेज व विलिंग्डन कॉलेज ग्रंथालयांना पुस्तकांच्या देणग्या.

१२) पुरस्कार :-

अ) सौ. शालिनी विष्णुपंत पाठक स्मृति प्रतिष्ठान (नागपूर)

आ) सांगली जिल्हा नगर वाचनालय यांचा संत साहित्यावरील लेखनासाठी ‘संत रामदास स्वामी’ पुरस्कार (२००३)

इ) प्रतिष्ठा प्रतिष्ठान (सांगली) पुरस्कार.

ई) मातृमंदिर विश्वस्त संस्था (निगडी-पुणे) यांचे २ पुरस्कार (२००८,२००९)

उ) करवीरपीठाच्या शंकराचार्यांच्या हस्ते ‘शास्त्रभूषण’ पुरस्कार (औदुंबर)(२०१०)

ऊ) कादंबरीकार ना.ह.आपटे ग्रंथ पुरस्कार,कोरेगांव (२००६)

१३) लेखन :-

अ) संस्कृत, इंग्रजी हिंदी व मराठी या चार भाषांत लेखन.

आ) लेखनाचे विषय :- उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, भगवद्गीता, शंकराचार्यांचे ग्रंथ रामानुजकृत श्रीभाष्य १.१.१, मध्वाचार्यांचे खंडनत्रय, सांख्यकारिका,जैन व बौद्ध दर्शन, पंचदशी, रामरक्षा इत्यादी स्तोत्रे, रामायणे:- वाल्मीकि, अद्भुत, आनंद व अध्यात्म, कालिदासाची नाटके व काव्य, प्राकृत भाषा व मराठी भाषा, संस्कृत व प्राकृत व्याकरण, अध्यात्म/परमार्थ, ज्ञानेश्वरांचे अभंग व अनुभवामृत, समर्थ रामदास स्वामींचा दासबोध, संकीर्ण.

इ) पन्नासपेक्षा अधिक नियतकालिकांतून लेखन प्रसिद्ध.



१४) संदर्भ ग्रंथात नोंदी :-

दिव्य ज्योति (संस्कृत), लर्नेड इंडिया व रेफरन्स इंडिया (इंग्रजी), आणि मराठी सारस्वत (मराठी) या संदर्भ ग्रंथात संक्षिप्त नोंदी.

*** प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचे प्रकाशित ग्रंथ :-**

१) संस्कृत भाषेत :-

१) श्रीगुरुलिंगगीतम् (१९९०) २) श्रीदासरामगीतम् (१९९१)

३) श्रीदासराममहाराजस्य अष्टोत्तरशतनामस्तोत्रम्

४) श्रीदासराममहाराजस्य सहस्रनामस्तोत्रम् (२०१०)

५) गुरुतृतीयाकथासारम् ६)श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रम् (२०१०)

२) व्याकरण ग्रंथ :-

१) हेमचंद्रकृत अपभ्रंश व्याकरण (१९६३)

२) त्रिविक्रमकृत प्राकृत शब्दानुशासन (१९७३)

३) वररुचिकृत प्राकृत व्याकरण (१९८७)

४) हेमचंद्रकृत प्राकृत व्याकरण (हिंदी) (१९९६)

३) भाषांतरित :-

१) कालिदासकृत विक्रमोर्वशीय नाटक (१९५९)

२) नासदीय सूक्त (१९८८)

३) भगवद्गीता : तत्त्वविवेचिनी टीका (२०००)

४) प्रेमदर्शन (नारद विरचित भक्तिसूत्र) (२००४)

५) अध्यात्म रामायण (२००४)

(३ ते ५ हे ग्रंथ डॉ. गो. रा. कुलकर्णी यांचे सह)

४) केवळ संपादित : -

१) श्रीदासरामवचनामृत (१९८७)

२) रेणुका माहात्म्य (प्रकाशन सन दिलेला नाही)

३) श्रीज्ञानेश्वर स्तोत्र आणि अन्य लघु ग्रंथ (१९९७)

४) श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (२००८)

५)शंकराचार्यांचे ग्रंथ (प्रस्तावना, भाषांतर, स्पष्टीकरण यासह) :-

१) ब्रह्मसूत्र -शांकरभाष्य चतुःसूत्री (१९७३) २) आत्मानात्मविवेक (२००२)

३) तत्त्वोपदेश (२००३) ४) शतश्लोकी (२००९)

६)जैनदर्शन :-

१) न्यायावतार (२००१) २) नयकर्णिका (२००२) ३) जैन तत्त्वज्ञान (२०११)

७)संकलन व संपादन : -

१) भगवती रेणुका देवी (२०१०) २) श्रीराम निकेतन (२०११)

३) श्रीराम निकेतनातील आराधना (२०११)

८) स्वतंत्र :-

१) श्रीगुरु तृतीया कथा (१९६७) २) चिमड संप्रदाय (२००५)

३) दासबोधातील तत्त्वज्ञान (२००७)

९)प्रस्तावनेसहित संपादित :-

१) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (२००२) २)आरतीसंग्रह (२००२)

३) चांगदेव पासष्टी आणि इतर ग्रंथ (२००२)

४) परमार्थ प्रश्नोत्तरी (पहिली व दुसरी आवृत्ति २००२, तिसरी आवृत्ती (२०१०)

५) भजनतरंग (२००६) ६) श्रीदासराम गाथा - पुरवणी (२००९)

७) श्रीदासराममहाराज आत्मचरित्र (२०१०)

८) श्रीदासराममहाराज श्लोकरचना (२०१०)

९) आत्माराम (दासरामकृत अर्थासह) (२०१०) १०) उत्तरगीता (२०११)

१०) संत चरित्रे :-

१) रघुनाथप्रिय साधुमहाराज यांची यशोगाथा (१९७९)

२) श्रीदासराम विहंगम जीवन दर्शन (गौरव ग्रंथात) (१९८०)

३) निंबरगीकरमहाराज (१९८३) (२०११) ४) चिमडमहाराज (१९८४) (२०११)

५) महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का (१९८६) (२०११)

६) श्रीदासरामजीवन (श्रीदासराम गौरव गीत मध्ये) (१९९९)

७) श्रीदासराममहाराज चरितामृत (२००३) (२०११)

८) श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र (आवृत्ति पहिली २००७, आवृत्ति दुसरी २००८,आवृत्ति तिसरी २०११)

९) रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र (२००९)



१०) नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र (२०१०)

११) माईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र (२०११)

११) भगवद्‌गीता :-

१) गीतेतील तीन पदे (१९९०) २)पाठांतर सुलभ भगवद्‌गीता (२००३)

३) श्रीमद् भगवद्‌गीता (प्रस्तावना भाषांतर व टीका यासह) (२००४)

४) भगवद्‌गीता (लेखसंग्रह) (२००७)

५) भगवद्‌गीता (निवडक श्लोकांवरील लेख) (२००८)

१२) प्रस्तावना आणि अर्थासह :-

१) सद्‌बोध दशक (२०११) २) श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध (२०११)

## ❊ नियतकालिकांत प्रकाशित झालेले ग्रंथ :-

अ) शंकराचार्यांचे ग्रंथ :-

१) एकश्लोकी २) पंचीकरण ३) वाक्यवृत्ति ४) विज्ञाननौका

५) लघुवाक्यवृत्ति ६) ब्रह्मज्ञानावलीमाला ७) निर्वाणषट्क ८) गुरु-अष्टक

९) कौपीनपंचक १०) अद्‌वैतपंचरत्न ११) स्वात्मप्रकाशिका

१२) स्वात्मनिरूपण १३) दशश्लोकी १४) ब्रह्मानुचिंतन

१५) अद्‌वैतानुभूति १६) स्वरूपानुसंधान-अष्टक १७) वाक्यसुधा

१८) मायापंचक १९) महागणेशपंचरत्न २०) आत्मबोध २१) साधनपंचक

२२) प्रौढानुभूति २३) तत्त्वबोध. २४) भवानी-अष्टक

२५) अनात्मश्रीविगर्हण २६) शिवपंचाक्षर स्तोत्र

२७) मनीषापंचक २८) अपरोक्षानुभूति २९) श्रीगणेशभुजंगस्तोत्र

३०) प्रश्नोत्तररत्नमालिका

आ) उपनिषदे :-

१) कलिसंतरण २) नारायण ३) कृष्ण ४)आत्मोपनिषत्

५) अमृतबिंदु ६) सर्वोपनिषत् ७) ब्रह्मबिंदु ८) निरालंब

९) हेरंब १०) कैवल्य.

इ) संकीर्ण :-

१) रामानुजाचार्यकृत श्रीभाष्य १.१.१.

२) मध्वाचार्यकृत खंडनत्रय

३) गौडपादभाष्यासह सांख्यकारिका ४) चूडामणिचरितामृत

५) रामरक्षा ६) रामगीता ७) श्रीगणेशप्रात:स्मरणस्तोत्र

८) आत्माराम (प्रकाशन चालू आहे)

ई) इंग्रजी भाषेत :-

१) आत्मानात्मविवेक २) शारीरक उपनिषद्

३) ब्रह्मबिंदु उपनिषद् ४) कैवल्य उपनिषद् ५) हंसगीता

६) भारतीय तत्त्वज्ञानातील आत्मसाक्षात्काराचे मार्ग

७) मूळगीता व तिचा वक्ता

*** अप्रकाशित ग्रंथ :-**

१) ब्रह्मसूत्रातील बौद्‌ध व जैन मतांचे खंडन (इंग्रजीत)

२) विस्तृत अर्धमागधी व्याकरण

३) शंकराचार्यकृत सर्ववेदांतसिद्‌धांतसारसंग्रह

४) शंकराचार्यकृत विवेकचूडामणि

५) हेमचंद्रकृत प्राकृत व्याकरण (मराठीत)

६) शंकराचार्यकृत प्रबोधसुधाकर

***

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र.................१९४०

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ.. १९५२

३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार.......१९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)...........१९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह........१९७१

६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह........................१९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र.................(सन दिलेला नाही)

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)..१९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र........................................................१९७५

११) सिद्धस्तुती...........................................................१९७७

१२) अमृतानुभव मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह........................१९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र...................................१९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र..............................(सन नाही)

१५) गुरुपाठ...............................................................१९८४

१६) सांप्रदायबोध....................................................... ...१९८४

१७) श्रीरामपाठामृत.........................................................१९८४

१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र......................................१९८४

१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र..............................१९८७

२०) नित्यपाठामृत..........................................................१९८७

२१) संजीवनपाठ............................................................१९८७

२२) श्रीदासरामवचनामृत...................................................१९८७

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति ......................................१९८८

२४) श्रीगोविंददर्शन ....................................................१९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत ....................१९८८

२६) श्रीदासरामगाथा ..................................................१९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण .....................१९८९

२८) श्रीगुरुमहिमा .......................................................१९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ .................................१९९७

३०) श्रीरामदासबोध .....................................................१९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला ................................१९९९

३२) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह).२००२

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी .......................२००२

३४) आरती संग्रह .......................................................२००२

३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ .......................................२००२

३६) हरिपाठ संकीर्तन ..................................................२००७

३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना.....................................२०१०

३८)अनुभवामृत, सम-ओवी-टीकेसह...................................२०१०

३९)परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी.......................................२०१०

४०)आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०१०

४१) ग्रंथत्रयी...............................................................२०११

४२) उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)...................२०११

४३) सद्बोध दशक.......................................................२०११

४४) गुरुराजकथित ज्ञान आणि बोध .....................................२०११

४५) श्रीदासराममहाराजलिखित लघुचरित्रे..................................२०११

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत(ओवी टीकेसहित) | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम(श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |



## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्‌बोध दशक (श्रीदासरामरक्षास्तोत्रासह) | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र (आवृत्ति ३री) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |
| प.पू.श्रीमाईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र | ३० | २०११ |
| पाठांतरसुलभ भगवद्‌गीता (आवृत्ति २ री) | ३१ | २०११ |
| श्रीदासराममहाराज लिखित लघुचरित्रे | ३२ | २०११ |
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत मनोबोध व निवडक अभंग (विवरणासह) | ३३ | २०११ |
| प.पू. सद्‌गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर | ३४ | २०११ |
| महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का | ३५ | २०११ |
| तो हा दासबोध | ३६ | २०११ |
| श्रीदासराममहाराज चरितामृत (२ री आवृत्ति) | ३७ | २०११ |
| श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र ( ४ थी आवृत्ति) | ३८ | २०११ |